ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक !

छात्र प्रबोधन

सौर वैशाख, शके १९३७ । वर्ष १५ अंक ८
वार्षिक वर्गणी ₹ २००, मूल्य ₹ २०



पाखरे भरारली

पाखरे भरारली निळी नभे झळाळली
पालवी नवी नवी तरूवरी थरारली
हासऱ्या सुरातूनी चालत्या पदातूनी
झेप घेऊन उसळली ही चेतना ।।ध्रु.।।

हिचे आम्ही शुभांशु रे
सतेज रे, सुहास्य लास्य रे
युवमनी जी, संचारते, प्रकाशते
गती हिची, द्युती हिची, स्फूर्ती
क्षितिज बाहते धरेस क्षेम द्यावयास या, या।।१।।

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

छात्र प्रबोधन

सौर वैशाख, शके १९३७। वर्ष १५ अंक ८

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२) २७४ वा अंक, वर्ष २३ अंक १०

प्रकाशन दिनांक - सौर ११ वैशाख, शके १९३७/१ मे २०१५

• अंतरंग •

४. **संवाद** - महेन्द्र सेठिया

५. कथा... **धडपड्या धोंडी** - सरोज चौगुले

१०. कविता... **पाणी-मनात...आत** - आश्लेषा महाजन

११. वाचलेच पाहिजे असे काही... **छंदांविषयी...** - जयश्री काटीकर

१३. माहितीपर... **चित्र समजून घेताना...** - अमृता वर्तक-देव

१७. प्रेरणादायी... **शिवलिंग मोहीम एक टर्निंग पॉईंट** - उमेश झिरपे

२०. **विज्ञान प्रयोग** - विनोदिनी अळवणी

२१. ललित... **हँगआउट** - शिल्पा कुलकर्णी

२५. लेखमाला... **समस्या परिहार** (लेखांक ९)
समस्यांचे वर्गीकरण - स्मिता निरगुडकर

२८. कृतिकौशल्य... **टाकाऊतून टिकाऊ** - शोभना साठे

२९. मुलाखत... **छंदातून कलानंदाकडे...** - कु. केवल मुळे

३१. मुलांचे पान... **बशीचे मनोगत** - कु. आरती कुदळे

३२. **जगात हास्य नसते तर...** - चि. पियूष बोरसे

मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य...
पाखरे भरारली - वाच. स्वर्णलता भिशीकर

याशिवाय – हसा हसा... (९), हा! हा! हा! (१५), जरा डोकं चालवा..., कृतिपर– झटपट रांगोळी (१६), व्यक्तीकार्ये (२७), करून तर पाहा (३३), प्रतिसादी वाचकवीर व्हा..., चला पत्ते खेळूया (३४) **तळटिपेतील ओळी –** 'जरूर पाहावेत' असे चित्रपट.

• संपादक, प्रकाशक, मुद्रक •
महेन्द्र सेठिया

• कार्यकारी संपादक •
शिल्पा कुलकर्णी

• संपादक मंडळ •
शैलजा देशमुख,
नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन

• मुखपृष्ठ मांडणी •
भरत केतकर

• आतील चित्रे •
अंजली पुरंदरे

• संपर्क पत्ता •
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

संकेतस्थळ
www.chhatraprabodhan.org

ई-मेल
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

मासिकाची वर्गणी
वार्षिक : ₹ २००, **द्वैवार्षिक :** ₹ ४००,
त्रैवार्षिक : ₹ ५५०,
दशवार्षिक : ₹ १,७००.
या अंकाची किंमत : ₹ २०
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा, घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४० जादा)

मुखपृष्ठाविषयी

अंकातील 'शिवलिंग मोहीम' या लेखाच्या संदर्भातील प्रकाशचित्रांचे हे कोलाज! गिरिप्रेमींना खुणावणारे हिमालयातील 'शिवलिंग' या दुर्गम शिखराचे झळाळते दर्शन एका प्रकाशचित्रात तर जिद्दीने त्या शिखराकडे वाटचाल करणारे गिर्यारोहक दुसऱ्या प्रकाशचित्रात दिसतात. प्रकाशचित्रातील सूर्यप्रकाशाच्या किरणांतून त्यांचा दुर्दम्य आशावाद प्रतिबिंबित होतो.

– भरत केतकर

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

चित्रपट पाहा : Wall E - पर्यावरणाच्या ऱ्हासासंदर्भातील विज्ञान काल्पनिका.

प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली

संवाद

स्वत:ची विविधांगी ओळख करून घेऊ इच्छिणाऱ्या प्रबोधकांनो,

'या सुट्टीचं काय करायचं?' असा प्रश्न पडलाय की 'खूप काही करायचंय, सुट्टी वाढवून कशी मिळेल,' असा प्रश्न पडलाय? खरं तर छात्र प्रबोधनच्या वाचक-सभासद-प्रबोधकांना (मागच्या महिन्याचा 'संवाद' वाचलाय ना? वर्गणीदाराकडून प्रबोधक होण्याकडे तुमचा प्रवास सुरू झालाय ना?) पहिला प्रश्न पडायचे कारणच नाही; इतकं आपल्या अंकातून तुमच्यापर्यंत पोहोचतंय. अंकात दिलेली व्यक्तिकार्ये करायला लागा. जोडी जमवून छात्र प्रबोधनच्या कार्यालयात संपर्क करा आणि लागा कामाला! पुण्यात असाल तर छात्र प्रबोधनच्या कार्यालयात येऊन ८ दिवस मासिकाच्या विविध प्रकारच्या कामांचा अनुभव घ्या. जूनमध्ये होणाऱ्या अभिवाचन कार्यशाळेत सहभागी व्हा! तुमच्याच गावात गट जमवून विज्ञान शिबिर घ्या. (मागच्या अंकात तपशील दिले आहेत.) मागच्या वर्षभरातले अंक एकत्रितपणे वाचून त्यात सुचवलेल्या कृती/ गोष्टी करून पाहा. हे सगळं करताना तुम्हाला खूप धम्माल येईल एवढं नक्की!

मागच्या आठवड्यात दहावीची परीक्षा दिलेली काही मुले-मुली भेटायला आली होती. माझा खास परिचय नव्हता; पण त्यांच्या आई-वडिलांना मी ओळखत होतो. दहावीनंतर काय शिकावे, कोणत्या विद्याशाखेत प्रवेश घ्यावा, पुढे कशाला 'स्कोप' आहे असे त्यांचे काही प्रश्न होते. मी त्यांना त्यांची सविस्तर ओळख करून द्यायला सांगितली! बहुतेकांनी, शाळा, आई-वडील-भावंडं इ. बद्दल सांगितलं. काहींनी शाळेतल्या व इतर ठिकाणच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी झाल्याचे सांगितलं. 'काय करायला आवडतं' असं विचारल्यावर *कॉम्प्युटर गेम्स,* टी.व्ही. पाहाणे, खेळ खेळणे इ. गोष्टी सांगितल्या. 'तुमचा स्वभाव कसा आहे? तुम्हाला काय चांगलं जमतं? तुम्ही कशात तहान भूक विसरून रमून जाता?' याबद्दल विचारल्यावर सगळे गप्प झाले. मग मी विचारलं, 'तुम्हाला एकटं राहायला आवडतं की गटात राहायला? तुम्हाला बैठं काम करायला आवडतं की भटकण्याचं काम करायला आवडतं? तुम्हाला माणसांशी बोलायला, त्यांना बोलतं करायला, त्यांना समजून घ्यायला आवडतं की तुमचं म्हणणं पटवून द्यायला आवडतं? तुम्हाला लिहायला आवडतं की चित्रं काढायला आवडतात की बोलायला आवडतं की गाणं गायला आवडतं की अजून काही? तुम्हाला पुढाकार घेऊन, जबाबदारी घेऊन काम करायला आवडतं की कोणाच्यातरी हाताखाली, कुठल्यातरी गटातला सदस्य म्हणून काम करायला आवडतं? की एकट्याला काम करायला आवडतं? विविध विषयांवरची नवनवीन माहिती गोळा करायला, समजून घ्यायला आवडते की निसर्गात भटकायला, रमायला आवडतं? तुम्हाला काय खास जमतं? छान करता येतं? तुमचे मित्र-मैत्रिणी, आई-वडील तुमची ओळख काय करून देतात?' यातल्या खूप कमी प्रश्नांची उत्तरे त्या मुलामुलींना देता आली. कारण माहितीये? कारण एक तर त्यांनी असा विचारच केला नव्हता, असे प्रश्न स्वत:ला विचारलेच नव्हते आणि या प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठीचे अनुभवच त्यांनी घेतले नव्हते. त्यामुळे आपण कसे आहोत, आपल्याला खरंच काय करायला जास्त आवडतं, कोणत्या गोष्टी सगळं चित्त ओतून, मनापासून आपण करतो हे त्यांना दहावीपर्यंत येऊनही कळलं नव्हतं. जगभरातली अद्ययावत माहिती एका 'क्लिक'वर तुम्ही मिळवू शकताय; पण स्वत:ची ओळख करून घ्यायला मात्र तुम्ही खूप कमी पडताय. हे चित्र बदलायला हवं असं मला वाटतं.

आपण जसजसे वयानं, शिक्षणानं मोठे होत जाऊ तसतशी आपली स्वत:ची ओळख वाढत जायला हवी. तुम्ही स्वत:बद्दल, स्वत:च्या स्वभावाबद्दल, गुणदोषांबद्दल, क्षमता-कौशल्यांबद्दल, आवडींबद्दल १५-२० ओळी लिहू शकाल का? लिहिण्याचा प्रयत्न करा. जे लिहिलं ते तुमच्या जवळच्या विश्वासाच्या व्यक्तींना सांगा. त्यांनापण तुमच्याबद्दल तसंच वाटतंय की काही वेगळं वाटतंय ते समजावून घ्या. या आधीच्या परिच्छेदात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी या सुट्टीत काही अनुभव ठरवून घ्या. तुम्ही या सुट्टीत जे काही कराल त्यातून तुम्हाला स्वत:ची अधिक ओळख पटायला हवी! त्यादृष्टीने या सुट्टीकडे तुम्ही पाहावं. मग ते प्रवास-पर्यटन असेल, नातेवाईकांना भेटणं असेल, घरगुती कार्यक्रमांमध्ये सहभागी होणं असेल, शिबिरं-सहली-कार्यशाळांमध्ये सहभागी होणं असेल. या सगळ्यांतून स्वत:ला शोधायचा, ओळखायचा प्रयत्न करा. 'आपण कसे आहोत' हे जसजसं कळायला लागेल तसतसं त्यातलं काय टिकवायला हवं, काय बदलायला हवं, काय मिळवायला हवं अन् काय सोडून द्यायला हवं! हे हळूहळू कळायला लागेल. त्यातूनच पुढे काय शिकायचं अन् का शिकायचं याची उत्तरं तुमची तुम्हालाच सापडायला लागातील.

स्वत:ला शोधण्याची प्रक्रिया आयुष्यभर चालणार आहे. पण त्याची डोळसपणे सुरुवात शालेय वयातच व्हायला हवी. ही सुट्टी त्यासाठी तुम्हाला उपयोगी पडो म्हणून मनापासून शुभेच्छा!

तुमचा दादा,



(महेन्द्र सेठिया)

परमात्म्याचे तेज घेऊन आत्मज्योती तेवत असते। रंग, रूप भिन्न, मात्र तत्त्व त्यातील एक असते।।

चित्रपट पाहा : The Bicycle Thief - बाप-मुलाच्या नात्याचे हळूवार भावबंध उलगडणारा नाट्यपूर्ण चित्रपट.

प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे - दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.

धडपड्या धोंड्या

– सरोज चौगुले

गावातल्या लोकांना मुलांचं त्या बाभुळवनात जाणं आवडायचं नाही. तिथले काटेकुटे, मोठी वारुळं, त्यात असलेले साप मुलांना अपाय करतील अशी भीती त्यांना वाटायची. सर्वात मोठी भीती होती ती बाभुळबनापासून थोड्या अंतरावर असलेल्या पडक्या विहिरीची!

असंच एक गाव होतं. दुष्काळी भागातलं होतं. त्यामुळं हिरवं गवत, झाडंवेली यांचं नावच नव्हतं. मात्र, कमी पावसावर वाढणाऱ्या काटेरी, खुरट्या बाभळीची झाडं तेवढी जिकडे-तिकडे होती. त्यामुळं गावाचं नावच 'बाभुळवाडी' पडलं होतं. बाभळीच्या फाटक्या सावलीच्या आधारानं पंचवीस-तीस झोपड्या उभ्या होत्या. तेच त्यांचं गाव. पुरुषमंडळी शेजारपाजारच्या मोठ्या गावात मजुरीसाठी जात. बायका लाकुडफाटा, मध, मेण, डिंक बाजारगावी जाऊन विकत. चारपाच कोसावरनं पाणी आणत, चूलमूल, घरसंसार सांभाळत आणि मुलं...? ना शाळा, ना कामधंदा! एखादी गाय, दोन-चार शेरडं घेऊन गवत मिळेल तिथवर लांब जायचं. गुरं चरायला सोडली की मुलं हुंदडायला रिकामी!

त्या गावात एक मुलगा होता. त्याचं नाव होतं धोंड्या; पण सगळे त्याला 'धडपड्या धोंड्या म्हणत. होताच तो तसा धडपड्या, कडमड्या! एका जागी स्वस्थ बसणं माहीतच नव्हतं त्याला. तो अत्यंत चौकस बुद्धीचा! त्याच्या मोठ्या टपोऱ्या डोळ्यांना जे दिसायचं ते इतरांना कळायचंच नाही. तो भुताखेताला, अंधाराला कशालाही घाबरत नसे. त्याच्या अंगातल्या चमत्कारिक खोडकरपणामुळं त्याला नेहमी मोठ्यांची बोलणी खावी लागत.

पण मित्रांचा मात्र तो लाडका होता. तो खारुटीसारखा कुठल्याही झाडांवर झटकन चढायचा, पटकन उतरायचा. अनेक खेळात तो पटाईत होता. सगळ्या मित्रांना सांभाळून घ्यायचा. सर्वात महत्त्वाचं म्हणजे तो बासरी खूप छान वाजवायचा.

गावापासून जरा दूर अंतरावर बाभळीची झाडं जरा दाटीवाटीनं वाढली होती. झाडांच्या फांद्या एकमेकांत घुसल्यामुळं थोडीशी सावली होती तिथं! त्या सावलीत एका दरडीवर बसून धोंड्या बासरी वाजवायचा. धोंड्याचे मित्र, गाई-गुरं त्या आवाजाने मंत्रमुग्ध व्हायचे. थोड्या वेळापुरतं जणू तिथं गोकुळ अवतरल्यासारखं वाटे!

पण...? गावातल्या लोकांना मुलांचं त्या बाभुळवनात जाणं आवडायचं नाही. तिथले काटेकुटे,

होऊ द्या निकोप वाढ शरीराची, मनाची। अंकुरतील रोपे इथे रोज नव्या स्वप्नांची।।

चित्रपट पाहा : झिंक चिक झिंग – स्वत:च्या कुटुंबाला आणि शेताला सावकाराच्या कचाट्यातून सोडवणाऱ्या मुलाची कथा.

प्रायोजक - बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे

मोठी वारुळं, त्यात असलेले साप मुलांना अपाय करतील अशी भीती त्यांना वाटायची. सर्वात मोठी भीती होती ती बाभुळबनापासून थोड्या अंतरावर असलेल्या पडक्या विहिरीची! कधीतरी धोंड्याच्या खापरपणजोबानं त्या दुष्काळी भागात विहीर खोदून, गावाला पाणी मिळवून द्यायचं धाडस केलं होतं. गावकऱ्यांनी त्याला मदत न करता त्याची कुचेष्टाच केली होती. तेव्हा तो एकटाच विहीर खोदत राहिला. दुर्दैवानं त्या विहिरीला पाणी लागलंच नाही. तो माणूस मात्र मरून गेला. 'विहीर खोदण्याची इच्छा अपुरी राहिल्यामुळे, तो भूत होऊन त्या विहिरीत राहिलाय' अशी लोकांची समजूत होती. त्यामुळं त्यांनी त्या विहिरीला 'भुताची विहीर' असंच नाव दिलं!

'अमावास्येच्या दिवशी विहीर खोदून पूर्ण करण्यासाठी भूत जिवंत लोकांना ओढून नेतं. त्यांना मारून भूत बनवतं आणि त्यांची प्रेतं बाभुळवनात टाकतं' अशी लोकांमध्ये वदंता होती. म्हणून लोक खूप घाबरत. मुलांना सज्जड दम देत. 'बाभुळवनाकडं, भुताच्या विहिरीकडं अजाबात फिरकायचं न्हाई. तिकडं गेला तर भूत तुमच्या नरडीचा घोट घेईल आणि घरला आलासा तर आम्ही तुमची तंगडी तोडून हातात देऊ!'

''काई तरी वेड्यागत बोलत्यात ही मान्सं! ह्यानी बघितलं का भूत कधी डोळ्यांनी? उगा आपला पराचा कावळा करायचा! आपून तर रोजच बाभुळवनात वाढूळ बसतो. कुठं काट्यानं कुणी रक्तबंबाळ झालं नाही, की कुणा सापाचा वावर आढळला न्हाई. भुताचा तर आवाजच न्हाई! मग का घाबरायचं? एकदा खरंच भूत हाय का? असला तर कसा दिसतो बघायलाच पाह्यजे!' धोंड्या मनाशीच पुटपुटायचा.

शेवटी त्यानं भुताचा पत्ता लावायचं पक्कं ठरवलं. त्याचा मित्र रघ्या आणि तो मिळून कुणाच्या नकळत विहिरीवर गेले. भीती वाटावी असं तितं काहीच नव्हतं! दहा-पंधरा फूट रुंद आणि वीस-पंचवीस फूट खोल, गोलाकार खड्डा होता तो. काटेरी झाडोऱ्यांनी, रानवेलींनी, धूळमातीनं, कचऱ्यानं तळ झाकला गेला होता. पहारीनं खोदल्यामुळे उभे खडक, कपाऱ्या राखणदारासारख्या उभ्या होत्या. सहजावारी कुणाला आत उतरता येण्यासारखं नव्हतं. मग भूत माणसाला कसं ओढून नेत असेल? काय प्रकार असावा? विचार करत धोंड्या रघ्यासोबत विहिरीभोवती चकरा मारत निरीक्षण करत होता. इतक्यात धोंड्या एकदम ओरडला,

''रघ्याऽ अरं लेका, ते बघ तिथं कांबळं दिसतंय त्याच्या पल्याड काईतरी चमकतंय रं!''

''हां! हां! व्हय रं व्हय! अरं ते भुताचंच काईतरी सामान असंल. आपुन आता हिथनं सुटू या. न्हाई तर भूत आपल्या मानगुटीवर बसंल!'' रघ्या भीतीनं थरथरत बोलला.

'छट् लेका! भित्री भागुबाई कुठली! अरं, भूत कांबळं रं कशाला घेईल? माणसागत त्याला थंडी, ऊन, वारा लागतांय का काय? आणि ते चमकतंय ते बघ पितळी घागर वाटतीया. भूत काय माणसावानी घागरीनं पाणी आणून पितंय असं म्हणतोस की काय? अरं येड्या, हिथं कुणी माणूस चोरून, लपून ऱ्हायल्यात नक्की'', धोंड्या निरीक्षण करत तर्क लढवत बोलला.

''अरं ऽ बाबा, माणूस असूं दे न्हाई तर भूत असूं दे, त्यांची जागा आपण बघितली म्हंटल्यावर झडप घालून विहिरीत ओढतील आपल्याला. आणि उद्याच्याला आपली प्रेतं दिसतील बाभुळवनात! कशाला इखाची परीक्षा घ्यायची? चल, चल लवकर घर गाठू यां!'' रघ्यानं जाणीव दिली.

तसा काळवेळ परिस्थिती लक्षात घेऊन विचार करत धोंड्या म्हणाला, ''व्हय. आता आपली काहीच तयारी न्हाई, तवा माघार घेऊया. पण दोन दिवसांत हे गुपित हुडकून काढायचंच!'' रघ्यानं मान डोलावली. दोघं घराकडे निघून गेले.

सत्य शिवाच्या सौंदर्याच्या स्वप्नाहूनही पुढे। आभाळाला कवेत घ्याया झेपावू चहुकडे।।

चित्रपट पाहा : पक पक पकाक – 'भुल्या' ने बदलून टाकलेल्या एका नाठाळ मुलाची गोष्ट.

प्रायोजक - सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टेक्सास, अमेरिका

दोन दिवसांनीच अमावास्या होती. भुतांचा खुशीचा दिवस. हमखास भुतं दिसणार. धोंड्यानं आपल्या निवडक मित्रांसह योग्य तयारी केली. काळ्याकुट्ट अंधाऱ्या रात्री ठरल्याप्रमाणे सगळे बाभुळवनात जमले. सोबत गलोली आणि छोट्या-मोठ्या दगडांचा साठा होता. बाभुळवनातून दबकत-दबकत विहिरीशी आले सगळे. आईवडिलांना न सांगता आल्याचं अपराधीपण, अंधार आणि भुताची भीती आणि काही वेगळं करण्याचा थरार यामुळं मुलांना छातीत धडधडल्यासारखं वाटत होतं. सगळे विहिरीच्या काठाशी आले. वाकून पाहिलं तर..? तळाशी उजेड दिसला. मुलं बिचकली म्हणाली,

''बाप रे! भुतांनी दिवटी लावली. तिच्या उजेडात दिसलो की आपल्याला फाडून खातील. आपण न्हाई बाबा हिथं ऱ्हाणार. आपण तर घर गाठणार!'

''खरबरदार! कुण्णी पळपुटेपणा करायचा न्हाई,'' धोंड्या कच खाणाऱ्या मुलांवर खेकसला. ''अरे लेको, ती जर दिवटी असती तर वाऱ्यानं तिची ज्योत लवलवली नसती का? दिव्याचा उजेड स्थिर आहे. म्हणजे ती विजेरी असंल! आन् भूत कधी वापरतं का विजेरी? घाबरून ऐन लढाईच्या वेळी राजीनामा द्यायचा न्हाई. गपचिप हाय तिथं उभं ऱ्हावा. आणि मी शिट्टी मारली की गलोल्यातनं तळाच्या अंदाजानं सटासट् दगडं मारायची कळलं?'' अर्थात मुलं सज्ज उभी राहिली. थोड्या वेळानं चोरांनी शेकोटी पेटवली. उजेड वाढला तशी मुलं मागं सरकली. धोंड्याला शेकोटीभोवती कांबळी पांघरलेली चार माणसं दिसली. म्होरक्यानं एक कांबळं जमिनीवर पसरलं. त्यावर प्रत्येकानं आपापल्या कमरेचा कसा रिकामा केला. सोन्या चांदीचे दागिने, नोटा, नाणी, रुपये साऱ्यांचा एक छोटा ढीग तयार झाला. धोंड्या रघ्याच्या कानात कुजबुजला,

''रघ्या, लेका बघ बघ, भुताचं भेव घालून लोकांला फसवणारे अट्टल चोर हायेत हे! बघ केवढा डल्ला मारलाय त्यांनी. त्यान्ला अद्दल घडवायलाच पाह्यजे! आणि....?

आणि रघ्याच्या 'होय', 'नाही' या उत्तराची वाट न बघता धोंड्यानं टण्णकन् उडी मारली, तोंडात बोटं घालून जीभ उलटी केली आणि जोरात सणसणून शिट्टी मारली. तशा पोरांच्या गलोली सुरू झाल्या. शेकोटीच्या उजेडाच्या दिशेनं आलेले दगड चोरांची टाळकी फोडू लागली. अचानक झालेल्या हल्ल्यानं बावचळून चोर ओरडू लागले.

खुणावते नभ गूढ अनंत वेध घ्यावया अज्ञाताचा। वास असावा धरणीवरती ध्यास धरावा दिव्य नभाचा।।

चित्रपट पाहा : फॅन्ड्री – बहुजन समजातील मुलाची कथा व व्यथा.

प्रायोजक - डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लास्गो, स्कॉटलंड

'ओय् ओय् मेलो ऽ 'आई गंऽ, आय आय टाळकं सडकलं, 'थोबाड फुटलं', 'अरंऽ, माझा डोळा जायबंदी झाला,' असं ओरडत नाचू लागले. तसा म्होरक्या ओरडला –

"अरं ए अडग्यांनो, चूप बसा! तोंडं बंद करा आणि तुमचं नाचकाम थांबवा! कुणाला तरी आपली जागा कळली. तुमच्या या बोंबलण्यानं माणसं आणि जरा सावध व्हतील! कळलं का म्या काय म्हंतो ते? एकदम चूप बसा! म्या बघतो कुण्णाचा जीव एवढा वर आलाय ते!" असं म्हणून तो कपऱ्यांवरनं थोडा वर येऊन ओरडला.

"अबे ऽ ए ऽ कोण हाय त्ये? म्होरं या. बंदुकीच्या गोळ्यांनी चाळणच करतो एकेकाची!"

धोंड्यानं खुणेची बारीक शीळ मारली. मुलं थोडीशी मागं सरकली आणि पुन्हा एकदा गलोलीनं विहिरीत दगडांचा पाऊस पाडला. चोरानं अंदाजानं गोळी झाडली. ठोऽ दिशी आवाज झाला तशी पोरं घराकडं धूम पळाली. पांघरुण तोंडावर घेऊन अंथरुणावर गपचिप पडली होती. अर्थात् धोंड्या आणि रघ्याही घरी परतले. पण केलेल्या धाडसामुळं मन हुरहुरत होतं. एवढी मोठ्ठी गोष्ट घरातल्या, गावातल्या लोकांना कधी एकदा सांगतो असं त्यांना झालं होतं. सकाळी–सकाळी धोंड्या आणि त्याचा मित्रमेळा गावचा म्होरक्या म्हादबाच्या दारात 'दत्त' म्हणून उभा राहिला. म्हादबानं दरडावून विचारलं –

"का रं? रामाच्या पाऱ्यात माझ्या दारात का धरणं धरलाय? तसं धोंड्यानं पोरांनी केलेल्या वीरश्रीचं वर्णन केलं आणि म्हणाला,

"अवंऽ म्हादू काका, त्या हिरीत भूत ऱ्हात न्हाई, आपल्यासारखी माणसं ऱ्हात्यात! चोर हायती ते!! लुटलेला माल वाटून घ्यायला लपवून ठेवायला येत्यात तिथं! दुसऱ्या कुणी माणसांनी तिकडं फिरकू नये म्हणून भुताची हूल उठवून भ्या घातली त्यांनी; पण आम्ही ना काल रातीला गलोलीनं त्यांची भंबेरी उडवली!"

"आँऽ? काय?" म्हादबानं आश्चर्यानं विचारलं. मुलांचं कौतुक करत म्हणाला, "भले शाब्बास रं मर्दानू! अरं पर तुम्ही पोरापोरांनी यवढा धोका कशाला पत्करला? आमालाबी बोलवायचं की!"

"कशाला? भूत हाय म्हणून घाबरून पळायला? चला आता अदुगर हिरीवर चला. आमी दाखिवतो, तुम्हाला दोन पायाची भुतं!" धोंड्या गडबडीनं बोलला.

"व्हय व्हय चला चला." म्हणून म्हादबा चालू लागला. त्यानं गावातल्या आणि चार लोकांना हाळी मारली. त्यांच्या मागनं बाकीचे गावकरी, पोरं काखोटीला मारलेल्या बायका, पोरं, म्हातारे असं सगळं लटांबर विहिरीच्या काठावर गोळा झालं. वर्षानुवर्ष भीती घालणारं भूत पोरांनी कसं घालवलं? याचं कुतूहल साऱ्यांना होतं. प्रत्येकजण जीव मुठीत धरून विहिरीत वाकून बघू लागलं. धोंड्या सगळ्यांना उद्‌देशून म्हणाला,

"भूत आगीला घाबरतं म्हंता न्हवं? मग बघा, त्यो बघा तळाशी त्यानी रात्री पेटवलेल्या शेकोटीचा जळून राख झालेला ढीग! आणि त्या कपारीमागं बेचक्यात दिसतंय का काळं कां बळं? जवळ चमकती ती घागर हाय! दिसलं का?

"व्हय रं ऽ व्हय!' सगळ्यांनी होकार भरला.

"मग तुमीच सांगा भूत कांबळं पांघरतं का? अन् पाणी प्याया पितळची घागर आणंल का? ही आपल्यासारखी माणसंच हायती. पण चोरटी हायती. त्येन्ला पकडलं की त्यांनी उभं केलेलं भूतबी मग पळून जाईल कुठल्या कुठे." धोंड्यानं सांगितलं.

"अरं व्हय, पर त्येन्ला पकडायचं कसं? ते काय आपली वाट बघत बसली असतील व्हय हिथं? माल घेऊन कवाच पाठीला पाय लावून पळाली असतील!" म्हादबानं धोंड्याला खुळ्यात काढलं.

"अवं काका तुमी तालुक्यास्नं पोलिसान्ला घेऊन या. तवर काय

वर्तुळातले विचार माझे चौकटीमध्ये दिवस ठोकले। छेद देऊनी त्यांना आता शौर्य गाजवू मला वाटले।

चित्रपट पाहा : चिंटू – 'चिंटू' या कार्टून कॅरेक्टर व मित्रांसोबतच्या गमतीजमती.

प्रायोजक – कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे

हालचाल झाली तर आमी हाईच की हिथं राखणीला. आन् चोर जाऊन-जाऊन कुठं जाणार? अवतीभवतीच्या गावातच दडी मारून बसतील न्हवं? ज्यांची टाळकी फटल्यात, कपाळाला पट्ट्या बांधल्यात, थोबाडं फुटल्यात त्या लोकान्ला पकडणं पोलिसान्ला काय अवघड जाईल व्हय?'' धोंड्या ठामपणानं म्हणाला.

''बरं बाबा, जातो म्या तालुक्याला?'' असं म्हणून म्हादबा निघाला.

''तवर म्या त्ये घोंगडं आन घागरीचं गुपित काय हाय त्ये बगतो,'' असं म्हणत धोंड्या कपऱ्यावरनं, उभ्या खडकावरनं माकडासारख्या उड्या मारत निघालासुद्धा! त्याच्या मागोमाग रघ्या आणि दोनचार कडमडी पोरंसुद्धा निघाली. दहा पंधरा मिनिटांत ते त्या कपारीजवळ पोचले. आत एक लंगडा माणूस घोंगडी पांघरुण अंगाचं मुटकुळं करून बसला होता. जवळ शिदोरी आणि ती चमकणारी पाण्याची पितळी घागर होती. पायावर कुऱ्हाडीचा घाव बसून घायाळ झाला होता तो. चालणं पळणं कठीण होतं. उचलून नेणं अवघड होतं; म्हणून त्याला एकट्याला सोडून बाकीचे निघून गेले होते. जखमेच्या वेदनेनं, भीतीनं हैराण झालेल्या त्याने जरा दरडावताच बाकीच्या चोरांची नावे, पत्ते सांगितले.

तातडीनं आलेल्या पोलीस इन्स्पेक्टरनं लंगड्याला ताब्यात घेतलं. बाकीच्या चौघा चोरांनाही पकडलं. त्यांच्याजवळचा लुटीचा माल जप्त केला. त्यांच्या हातापायात बेड्या घातल्या आणि पोलीसगाडीतून त्यांना तुरुंगात टाकण्यासाठी निघाले. जाण्यापूर्वी इन्स्पेक्टरनं धोंड्या आणि त्याच्या मित्रांचं कौतुक केलं. म्हणाले,

''धोंड्या, शाब्बास मर्दा! तुझ्या धाडसानं, चौकस बुद्धीनं एक बदमाश चोरांची टोळी तुम्ही सापडवून दिली. लोकांच्या मनातली भुतांची भीती दूर केलीस. सरकार तुला बक्षीस देईलच. तवर आता माझ्याकडून हे तुला बक्षीस!'' असं म्हणून त्यांनी शंभर रुपयाची नोट धोंड्याला दिली.

इन्स्पेक्टर चोरांना घेऊन निघून गेले. आता गावकरी धोंड्या भोवती गोळा झाले. कित्येक वर्षांचं भुताच्या अस्तित्वाचं, भीतीचं दडपण संपलं होतं. धोंड्याच्या धडपड्या, धाडसी, चौकस बुद्धीमुळं हे घडलं होतं.

✲✲✲

– सरोज चौगुले
प्लॉट नं. ५७, 'धनसरोज'
रत्नाप्पा कुंभारनगर – २, कोल्हापूर

हसा हसा...



आई : बाळू, छोटू का रडतोय?
बाळू : त्याच्याकडे एकच चॉकलेट होतं आणि ते कसं खायचं हे मी त्याला शिकवलं म्हणून!

एक कुत्री विकणारा माणूस म्हणतो, ''हा एकदम विश्वासू कुत्रा आहे.''
''कशावरून?'' गिऱ्हाईक
''अहो, आजवर दहा वेळा विकला. पण सगळ्यावेळी तो विश्वासाने माझ्याकडे परत आला.''

रेल्वेत दोन माणसं समोरासमोर बसलेली असतात. एक जण खिडकी उघडून म्हणतो, ''काय उकडतंय.'' दुसरा लगेच खिडकी बंद करून म्हणतो, ''काय गार वारा लागतोय.''
पुन्हा पहिला माणूस खिडकी उघडतो. लगेच दुसरा बंद करतो.
असं बऱ्याच वेळा झाल्यावर पलीकडे बसलेला माणूस सांगतो.
''तुम्ही जी खिडकी उघड-बंद करताय तीला काच नाहीये!''

भूमीवरचा कण कण सदा तुला देईल ग्वाही। 'विजय होतो सत्याचा' गातील पहा दिशा दाही।।

चित्रपट पाहा : ताऱ्यांचे बेट – मुंबईच्या सहलीत अनोखी पैज जिंकू पाहणाऱ्या वडील-मुलाची गोष्ट.

प्रायोजक – सौ. प्राची अमर परांजपे, सांगली



पाणी- मनात...आत

आई नेहमी म्हणते, ‘वाया घालवू नये कधी पाणी
कारण देवानंच केलीय आभाळातून त्याची पाठवणी
देव म्हण किंवा निसर्ग हवं तर त्याला म्हण
नावात काय आहे? जाणून घे माझं मन...’

मी माझ्या मनात कोरतो पाण्याचे रूप-चिंब
आणि जपून ठेवतो डोळ्यांत त्याचे ओले खोल बिंब
दमल्या भागल्यावर जेव्हा मला लागते तहान
जाणवते काळजाला, पाणी तर अमृतासम महान!

पाणी पीत असताना मी वर करतो मान
आणि ढगांच्या भरभरून देण्याचे ठेवतो भान
पाण्याच्या थेंबाथेंबावर पोसते हिरवे पाते
दाण्याच्या कणाकणावर चिवचिवते गोंडस नाते

उरले सुरले मळलेले पाणी आई नित्यनेमाने
पाजते परसातल्या तुळशी-मोगरीला प्रेमाने
पाजता पाजता आई सांगते थेंबाची गोष्ट
ज्यात असते काळी आई नि शेतकऱ्याचे कष्ट...

आईच्या गोष्टीमुळे पाणी मुरते मनात...आत
आणि फांद्यांचे हात झेपावतात आभाळात
मी आईकडे बघतो, ती मला नदीसारखीच भासते
ओल्या मातीचे कौतुक तिच्या डोळ्यांमध्ये वाहते...

तिच्या विचारांचा प्रवाह पाझरतो माझ्या मनात
मी त्यात वाहतो...पण वाहवत नाही जात...!
वाहवत नाही जात....!!

– आश्लेषा महाजन
‘मंजिरी’, २३० चित्ररेखा सोसा.,
सहकारनगर क्र. १, पुणे 411009

छात्र प्रबोधनतर्फे अभिवाचन कार्यशाळा – ४ ते ६ जून २०१५, इयत्ता ८ वी ते १२ वीच्या मुला-मुलींसाठी, **शुल्क ₹ ४००/–** तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन, सुप्त नाट्यगुणांना वाव देणारी, वाचिक अभिनयाला खतपाणी घालणारी, साहित्याची गोडी वाढवणारी, ३ दिवसांची कार्यशाळा. सहभागी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने समारोप.

उन्हामध्ये झाड त्याची सावली गार गार। खडकामधून झऱ्याची निर्मळ जळधार।।

चित्रपट पाहा : यलो – गौरी गाडगीळ या down's syndrome ने ग्रस्त मुलीच्या जिद्दीची गोष्ट.

प्रायोजक - श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५

वाचलेच पाहिजे असे काही...

छंदांविषयी

– जयश्री काटीकर

छंद म्हणजे काय रे भाऊ? छंद जोपासण्याची अचूक वेळ कोणती? छंद सहज जाता-जाता करायचा असतो, की त्यासाठी जाणीवपूर्वक काही कष्टही घ्यायचे असतात? एखाद्या छंदाचा काही मर्यादित काळ असतो, का अमर्याद उरतो तो छंद? माणसाच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे छंद बदलता असतो का? पोस्टाची तिकिटं जमवण्याचा छंद म्हणजे केवळ संकलन... की एखादं तिकीट मिळवण्यासाठी आकाश पाताळ एक करणं..., की त्याहून काहीतरी अधिक? छंदाबद्दलच्या आपल्या मनातल्या अशा वाकड्या-तिकड्या प्रश्नांना आपोआपच उत्तरं मिळत जातात, अनिल अवचट यांचे 'छंदांविषयी' हे पुस्तक वाचताना!

चित्र, शिल्प, ओरिगामी, स्वयंपाक, फोटोग्राफी, बासरी, वाचन (आणि इतरही काही) इ. आपल्या छंदांविषयी पुरेसं सविस्तर चिंतन अवचटांनी या पुस्तकात केलंय. हे छंद त्यांना कसे जडले, छंद म्हणून विकसित होईपर्यंतची प्रक्रिया कशी होती, त्यात त्यांना कोणाचं मार्गदर्शन मिळालं, 'समछंदी' मित्र - हितचिंतक कसे लाभले, त्यातल्या तंत्राचा, तंत्रज्ञानाचा परिचय ते कौशल्यापर्यंतचा प्रवास कसा घडला, 'हा छंद जिवाला लावी

पिसे' अशी अवस्था झाल्यावर घरा-दाराच्या प्रतिक्रिया, त्या त्या छंदाविषयीच्या नेमक्या टिप्स.. अशा सर्व काही गोष्टी या पुस्तकात त्यांनी लालित्याने मांडल्या आहेत.

एवढंच नाही तर त्या छंदाच्या कलेची देशोदेशीची परिस्थिती, आंतरराष्ट्रीय पातळीवरचे कलाकार त्या कलेचे वेगवेगळे प्रकार - पद्धती - शैली - विचार याबद्दलचे विवेचनही ते करतात. या सगळ्या पार्श्वभूमीवर स्वत:चा पिंड काय आहे ते जाणून घेऊन स्वत:ची कला सतत पडताळून पाहताना दिसतात. त्यासंबंधीची वेगवेगळी पुस्तकं मिळवून, वाचून त्याचा अभ्यास करून आपल्या स्वभावधर्माशी प्रामाणिक राहून आपला छंद जोपासताना दिसतात.

हे सगळे तपशील वाचताना, ते समजून घेताना त्या-त्या कलेबद्दलच्या आपल्या जाणिवा तर समृद्ध होतातच; पण त्यांनी त्या-त्या छंदांच्या माध्यमाबद्दल जे विचार व्यक्त केले आहेत, दोन छंदांची तुलना करत स्वत:कडे जे पाहिलं आहे; ते वाचणं हा एक विलक्षण अनुभव ठरतो. कुठल्याही माध्यमाकडे पाहण्याची दृष्टी मिळायला हे पुस्तक वाचलंच पाहिजे, असं आहे.

बासरीबद्दल लिहिताना ते म्हणतात, *''चित्र काढण्याची मला आवड असल्याने सुरांचे आकार, रंग पाहाणं हे मला नवीन क्षेत्र मिळालं. बासरी/गाणं ऐकताना वरखाली जाणाऱ्या, वळसे घेणाऱ्या रेघा दिसू लागल्या.''*

शिल्पकलेबद्दल ते म्हणतात, *''लाकूड हाताळताना वाटतं की आपण जिवंत माध्यमावर काम करतोय. या माध्यमाने अनेक उन्हाळे, पावसाळे, वणवे, दुष्काळ पचवलेत... प्रत्येक लाकूडच काय पण एकाच लाकडाचासुद्धा प्रत्येक भाग वेगळा...''*

छंदाची सुरुवात कशी झाली हे जाणून घेणंही मनोरंजक आहे. आपल्या शिल्पकला या छंदाची सुरुवात 'शाळेत असताना पेन्सिलीला विशिष्ट प्रकारे टोक करण्यापासून झाली असावी' असं अवचट म्हणतात. बाक कोरायच्या सवयीचाही हा परिणाम असेल असे ते सुचवतात. स्वयंपाकात दही लावणे, कणीदार तूप मिळण्यासाठी लोणी कढवणे, कुकरमध्ये योग्य प्रमाणात पाणी घालायची कसरत करणे हे त्यांना महत्त्वाचे वाटते. फोटोग्राफीबद्दल

रानफुलांच्या रंगांचे किती दाटलेले थवे। काय हितगुज त्यांचे फुलपाखरांच्या सवे।।

चित्रपट पाहा : दहावी फ – व्रात्य, खोडकर म्हणवणाऱ्या मुलांच्या विघातक शक्तीला विधायक रूप देणारी कहाणी.

प्रायोजक - श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

सांगताना तंत्रज्ञानाची प्रगती आपल्या लक्षात येते.

अनिल अवचट यांचं काम, त्यांची पुस्तकं तशी ओळखीची. त्यांच्या चित्रकला, ओरिगामी इ. छंदाबद्दलही कधी मुलाखतींमधून, लेखांमधून कळलेलं, काही मासिकांवरची अवचटांची मुखपृष्ठंही परिचयाची. पण एवढ्या सगळ्या छंदाविषयी एकत्रितपणे वाचताना वाटतं, ‘अरे, काय अफाट माणूस आहे हा! किती किती माध्यमातून भिडतोय आयुष्याला! क्षण न् क्षण आनंदाने जगतोय. सामाजिक कार्यासाठीची वणवण, त्यासाठी भरपूर प्रवास, त्यांचं खास लेखन... कसा आणि कुठून वेळ मिळत असेल त्यांना हे छंद जोपासायला?’ पण मग पुस्तक वाचताना उत्तरंही सापडू लागतात. आपल्याला आवडणाऱ्या गोष्टी करायला ठरवलं तर वेळ कसाही उपलब्ध होऊ शकतो; हे खरं! शिवाय अवचटांनी हे सगळे छंद जोपासले ते पैसा-प्रसिद्धी-यश यासाठी निश्चितच नव्हे तर स्वान्त सुखाय-स्वत:च्या आनंदासाठी. त्यामुळेच स्पर्धेतल्या यशापेक्षा, प्रदर्शन भरवण्यापेक्षा ती कलाकृती करण्याच्या प्रक्रियेतला आनंदच त्यांना लाखमोलाचा वाटतो. म्हणूनच ते म्हणतात, *“पंचतारांकित हॉटेलमध्ये जाऊन एखाद्याला जो आनंद होतो, तो मला घरी दोन तास लाकूड घासण्यात मिळतो.”*

आपल्या सगळ्या छंदांविषयी ते कृतज्ञ आहेत. ‘छंदांनी मला काय दिले’ हे सांगताना ते म्हणतात, *“... यांनी मला चिकाटी शिकवलीय. जादा आत्मविश्वास कसा घात करतो, कमी आत्मविश्वास कसं डबकं निर्माण करतो, हे सप्रयोग सांगितलंय. संकटाने नामोहरम न होता त्याला वळसा घालून जाता येतं, ही वाट दाखवलीय...”*

म्हणूनच आपल्या छंदाकडे वेगळ्या दृष्टीने पाहण्याची प्रगल्भता निश्चितच या वाचनातून येईल आणि ज्यांना छंद नाहीत अशांना छंद, त्याची प्रक्रिया, त्यातला आनंद - विरंगुळा - समाधान आपणही अनुभवावं ही प्रेरणा मिळेल.

पुस्तकाचे नाव : छंदांविषयी
लेखक : अनिल अवचट
प्रकाशन : मॅजेस्टिक
पृ. संख्या : १४८, **किंमत** ₹ १८०

***

- जयश्री काटीकर
सिंहगड रस्ता, सनसिटी, पुणे 411051

अनेकातून एक अर्थ - काही सामासिक शब्दांमध्ये अशी सुप्त शक्ती असते, की त्या शब्दांनी अनेक वस्तूंचा निर्देश होवू शकतो; पण आपण मात्र ठरावीक अर्थाशीच त्या शब्दाची पक्की गाठ मारली आहे. बघा कसं ते -

१. जलद : जल म्हणजे पाणी, पाणी देणारा तो जलद पण आता आपण फक्त ढगासाठीच वापरतो.
२. पंकज : पंक म्हणजे चिखल. चिखलात जन्मणारे सगळेच पंकज. पण आता यातून लक्षात राहाणारी वस्तू कमळ.
३. पती : स्वामी, मालक, रक्षक हा मूळ अर्थ पण आपण तो फक्त ‘नवरा’ या अर्थाने वापरतो.
४. पथ्य : उपयोगी, हितकारक आता आजारपणातलं विशिष्ट अन्न याअर्थी आपण वापरतो.
५. कुशल : दोन्ही बाजूंनी धार असलेलं गवत (कुश) तोडायला जी वाकबगार व्यक्ती लागते ती. पण आता निपुण याअर्थी वापरतात.
६. नेता : पुढे घेऊन जाणारा कोणीही नेताच. आपण आता ‘पुढाऱ्याला’च नेता म्हणतो.
७. खग : ‘ख’ म्हणजे आकाश. आकाशात जाणारा तो खग. आता फक्त पक्षी या अर्थानेच वापरतात.

दवभरल्या रानात उन्ह मधाळ हासले। मंद सोनेरी वर्खाने पानापानास माखले।।

चित्रपट पाहा : बोक्या सातबंडे - दिलीप प्रभावळकरांच्या ‘बोक्या सातबंडे’ पुस्तकावर आधारित.

प्रायोजक - चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे

चित्र समजून घेताना...

– अमृता वर्तक–देव

चित्रकला फार अवघड नसते. चित्र काढण्याच्या या कलेत फार गंमत आहे. कारण यात आपल्याला फारसे नियम नसतात. मनातल्या भावना किंवा डोक्यातले विचार आपल्याला सांगतील, तसे आपण चित्र काढू शकतो. खरंतर चित्रकला, आपल्या मनातलं जगाला सांगण्याचं एक प्रभावी माध्यम आहे. भाषेसारखं चित्रकलासुद्धा एक संवाद साधण्याचं माध्यम आहे.

चित्रामध्ये आपल्याला जे दिसतं ते काढण्याबरोबरच आपल्याला हवं असलेलं जगदेखील चितारता येतं. मग ती एखादी कार्टून फिल्म असो किंवा व्हॅन गॉगचं 'स्टारी नाईट.' चित्रामध्ये चित्रकाराला काय सांगायचं आहे किंवा काय दाखवायचं आहे, याला फार महत्त्व आहे. चित्रकार मग त्याच्या विचारांप्रमाणे रेषा, रंग, आकार, रचना यांची निवड आणि मांडणी करतो. चित्रकलेत चित्राचे *Realistic, Creative* आणि *Abstract* असे प्रकार पडतात.

Realistic चित्रांमध्ये निसर्गामधील आणि आपल्या आजूबाजूच्या जगामधील सादर्य टिपून ते हुबेहुब चितारण्याला महत्त्व आहे. मग ते निसर्गचित्र असो किंवा एखादे व्यक्तिचित्र. निसर्गातील रंगांची उधळण, त्याचे रौद्ररूप आणि निसर्गातल्या इतरही अनेक छटा बारकाव्यांसह काढण्याला महत्त्व आहे.

व्यक्तिचित्रामध्ये, व्यक्ती जशी दिसते आहे तशीच त्याच्या संपूर्ण बारकाव्यासह काढणं आणि सत्याच्या जास्तीत जास्त जवळ जातील असे रंग भरून ते जिवंत करणं यात खरं कसब आहे.

Abstract प्रकारची चित्रे ही *Realistic* चित्रांच्याबरोबर विरुद्ध असतात. त्यात चित्रकाराने निवडलेले रंग, चित्राची मांडणी, चित्रातले आकार यांना महत्त्व असते. चित्रकला म्हणजे फक्त दिसणारी गोष्ट हुबेहुब काढणं एवढ्या पुरतंच सीमित नाही. मनातल्या भावनांना, विचारांना चित्राच्या किंवा रंगांच्या माध्यमातून वाट करून देता येणं हे चित्रकलेचं सर्वात मोठं सामर्थ्य आहे. त्यामुळे abstract किंवा अमूर्त चित्रांमध्ये आपल्याला आजूबाजूचे, ओळखीचे आकार दिसतीलच असे नाही. मात्र रंगसंगतीचा, चित्राच्या रचनेच्या

Realistic


Creative

जसे पुढती निघावे गोळा करित फुलाला। तसा किरणे वेचित सूर्य जाई पश्चिमेला।।

चित्रपट पाहा : टिंग्या – बैलावर जिवापाड प्रेम करणाऱ्या मुलाची गोष्ट

प्रायोजक – सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे



सामर्थ्याचा पुरेपूर वापर या चित्रप्रकारात दिसतो.

या दोन्हींचा सुवर्णमध्य म्हणजे *creative painting.* आपल्या डोक्यातले विचार पाहाणाऱ्यापर्यंत प्रभावीपणे पोचवण्यासाठी या चित्रप्रकाराचा अनेक चित्रकार वापर करतात. एकाच रंगांच्या अनेक छटांचा वापर करून काढलेलं निसर्गचित्र, भौमितिक आकार वापरून काढलेलं झाड, नेहमीच्या प्रमाणबद्ध असलेल्या गोष्टींची, व्यस्त प्रमाणात काढलेली चित्र, ही काही *creative painting* ची उदाहरणे म्हणता येतील. *creative painting* चे एक उदाहरण म्हणून साल्वादोर दालीचं *persistence of memory* हे चित्र पाहाता येईल.

Abstract painting चा आत्मा म्हणजे चित्राचा विषय किंवा विचार असतो. ते उगाच गंमत म्हणून काढलेले आकार किंवा रंगांचे फराटे नसतात. या चित्रांमध्ये विशिष्ट विषयाचा, रंगसंगतीचा, आकारांच्या निवडीचा विचार दिसतो. चित्रकार चित्र काढायचे ठरवतो, तेव्हा चित्राचा आकार केवढा आणि कसा असावा, चित्र कॅनव्हासवर काढावे की पेपरवर की आणखी कशावर, कोणत्या प्रकारचे रंग वापरायचे(water , oil की acrylic), रंगांच्या कोणत्या छटा वापरायच्या, चित्रात नक्की काय काढायचं, या सर्वांचा विचार तो करत असतो. त्यामुळे, चित्रात प्रत्येक गोष्टींचा बारकाव्याने विचार केला आहे, त्यामागे विशिष्ट कारण आहे हे चित्र पाहाताना लक्षात असायला हवं.

विचार करण्याची क्षमता आणि तर्क, या माणसाला मिळालेल्या देणग्या आहेत. या दोन्हीचा वापर केला तरच कोणत्याही कलेचा आविष्कार शक्य आहे, याचे भान कलेचा आस्वाद घेतानाही लक्षात ठेवायला हवे. 'मला चित्र कळतच नाही' असं म्हणून चालणार नाही. असं केलं तर आपण चित्र समजून घेण्याचा प्रयत्नसुद्धा करू शकणार नाही. चित्रकारसुद्धा आपल्या सारखाच माणूस आहे; तोसुद्धा त्याच गोष्टी, घटना पाहात असतो. ज्या आपल्याही आजूबाजूला घडत असतात. चित्रकाराचीसुद्धा रंगाबाबतची, आकारांबाबतची समजूत त्याच निसर्गाचे आणि वातावरणाचे निरीक्षण करून तयार झालेली असते. ज्याचे आपणही एक भाग आहोत. फक्त जाणीवपूर्वक केलेल्या निरीक्षणामुळे त्याला आसपासच्या गोष्टींचे जास्त चांगले भान आलेले असते. कारण तो सर्व गोष्टी 'पाहात' असतो.

'बघणं 'आणि 'पाहाणं' यात फरक आहे. तुम्हा कुमारांच्या भाषेत सांगायचं तर 'बघणं' म्हणजे *इंटरनेटवर* फक्त *ब्राऊज* करण्यासारखं आहे. आणि 'पाहाणं' म्हणजे एखाद्या विषयाबद्दल *'गुगल सर्च '* करून त्यावरची माहिती वाचून त्यावर विचार करण्यासारखं आहे. 'वरवर बघितलं आणि सोडून दिलं' आणि 'नीट पाहिलं आणि नीट लक्षात ठेवलं' इतकं ते एकमेकांपासून वेगळं आहे. हा फरक फक्त डोळ्यांशीच संबंधित नाही. एखादी गोष्ट अनुभवताना, डोळ्यांबरोबरच आपलं स्पर्शज्ञान, कान, नाक आणि इतरही ज्ञानेंद्रियांचा पुरेपूर वापर करणं गरजेचं आहे.

कोणतीही कला शिकण्यासाठी रियाजाची गरज असते. तसंच कोणतीही कला समजून घेण्यासाठीसुद्धा रियाजाची गरज असते. याचा अर्थ असा नाही, की आपण उद्यापासून रोज एक तास चित्र पाहूया आणि त्यावर विचार करूया. उघड्या डोळ्यांनी आजूबाजूला, घरात, बाहेर, रस्त्यावर, बागेत सगळीकडेच जाणीवपूर्वक पाहाणे गरजेचे आहे. घरातल्या रोजच्या वस्तूंचा आकार, पोत, रंग, त्यावर पडणारा प्रकाश डोळसपणे पाहाणे गरजेचे आहे. मग आपोआपच प्रत्येक रंगाबरोबर असणाऱ्या भावभावनांच्या नात्यांचा उलगडा आपल्याला होऊ लागेल. त्यामुळे मग हा रंग असा का? हा रंग इथे का वापरला आहे? अशा

संवेदना फुलवणाऱ्या ऋतुरंगी न्हाऊन जा। भूमीतला कोंब नवा जाता जाता पाहून जा।।

चित्रपट पाहा : कायद्याचं बोला – दोन मुलांना कायद्याच्या तावडीतून सोडवणाऱ्या मामाची कथा.

प्रायोजक - श्री. राहुल भिडे, पुणे

प्रश्नांची उत्तरे आपल्याला आपोआपच मिळत जातील. एखाद्या विषयातली माझी उत्तरं मला सापडत आहे म्हटलं, की त्याचा अभ्यास करायला कशी तुम्हाला मजा येते; तसंच चित्राचंसुद्धा होऊ लागेल.

आपण लिहिताना किंवा बोलताना जसा शब्दांचा, वाक्यांचा उपयोग करतो, तसेच चित्रांमध्ये रंगांचा आणि आकारांबरोबर, रेषांचा आणि रचनेचा (composition) वापर करतात. बोलताना, आपण एखादा शब्द ठसवण्यासाठी जसा त्याच्यावर जोर देतो; तसंच चित्रात एखादी गोष्ट ठसवण्यासाठी आणि चित्राचा मूड तयार करण्यासाठी रंगांचा वापर करतात. फोटोबद्दल म्हणतात, 'एक फोटो हजार शब्दांच्या तोडीचा असतो.' तसेच चित्रांबाबतपण आहे, कारण दोन्हीही 'दृश्य' कला आहेत. कवितेतल्या वृत्ताप्रमाणे चित्रातले रंग असतात. त्यांची निवड आणि उपस्थिती इतकी सहज असते, की ती अनेकदा ग्राह्य धरली जाते. 'रंग' जसे चित्राला व्यक्तिमत्त्व देतात, तसे 'आकार' चित्राचा विचार स्पष्ट करतात. चित्रातले आकार आणि रचना ही चित्राची ओळख असते. रंग आणि आकाराबरोबरच चित्राचा तिसरा महत्त्वाचा घटक म्हणजे रचना. हा चित्राचा कणा आहे. वाक्यातील शब्दांच्या रचनेमुळे अपेक्षित म्हणणं मांडता येतं. त्याप्रमाणे चित्रामध्ये आकाराच्या रचनेमुळे अपेक्षित विचार मांडता येतात. त्यामुळे **कोणत्याही चित्राचा आस्वाद घेताना रंग, आकार आणि रचना यांचा विचार होणं गरजेचं आहे.**

सामान्यपणे, आपण सर्वजण आपापल्या दृष्टीकोनातून जगाकडे पाहात असतो. आपल्या खिडकीतून दिसणाऱ्या



आकाशाच्या तुकड्याला आपण संपूर्ण आकाश समजत असतो. चित्रकार आपल्याला त्याच्या आकाशाचे रंग त्याच्या चित्रातून दाखवत असतो. आपली सुखदुःखं, भावभावना बाजूला ठेऊन आपण जर एखादं चित्र पाहिलं, तर आपण एका नवीन नजरेतून जगाकडे पाहू शकतो. माझ्यामते, चित्र 'पाहाणं' ही एखाद्या घटनेकडे किंवा गोष्टीकडे आपल्यापेक्षा वेगळ्या दृष्टीकोनातून पाहाण्याची संधी आहे. त्यामुळे संधी मिळेल, तेव्हा चित्र 'पाहायला' विसरू नका...

❊❊❊

– अमृता वर्तक–देव
vartak.amruta@gmail.com

हा ! हा ! हा !

एक वकील आणि एक शेतकरी एकत्र प्रवास करत होते. वेळ घालवण्यासाठी वकील म्हणाले, ''आपण एकमेकांना कोडी घालू, ज्याला येणार नाही, त्याने १० रु. द्यायचे.'' शेतकरी म्हणाला, ''आपण खूप शिकलेले आहात आणि मी अडाणी खेडूत आहे. मला उत्तर देता आले नाही तर मी १ रु. देईन. तुम्ही मात्र दहाच रुपये द्यायचे.'' वकिलांनी मान्य केले. सर्वप्रथम शेतकऱ्याने कोडे घातले, ''अशी कोणती व्यक्ती आहे, जिला २ डोकी व ३ पाय आहेत?'' वकीलांना विचार करून सुचले नाही. तेव्हा ते म्हणाले, ''हरलो बुवा ! हे घे १० रुपये. आता तुच सांग बघू उत्तर.''

''साहेब, मला तरी कुठं येतंय? हा घ्या १ रुपया.''

आला आला संधिकाल थांबे वारा झाडापाशी। माथ्यावरले आभाळ झाले पुन्हा चंद्रवंशी...।।

चित्रपट पाहा : I am Kalam – राष्ट्रपती कलाम यांच्याकडून प्रेरणा घेणाऱ्या मुलाची कथा.

प्रायोजक – प्रतिभा इलेक्ट्रिकल्स, पुणे

कोणाचा व्यवसाय काय?

लिंबोणी या छोट्याशा गावी आम्ही जेव्हा प्रथम राहायला गेलो तेव्हा त्या गावातील सहा कुटुंबांची आडनावे आणि त्या-त्या कुटुंबातील कुटुंबप्रमुख करत असलेला व्यवसाय लक्षात ठेवताना माझी आणि माझ्या पत्नीची चांगली भंबेरी उडाली!

त्या कुटुंबाची आडनावे सुतार, कोळी, माळी, वैद्य, वकील आणि पुजारी अशी होती आणि त्यांचे व्यवसाय होते सुतारकाम, मासेमारी, बागकाम, वैद्यकीय, वकिली आणि पूजाअर्चा करणे. तथापि कोणत्याही कुटुंबप्रमुखाचा व्यवसाय त्याच्या आडनावावरून सूचित होणाऱ्या व्यवसायाशी जुळणारा नव्हता. आणि तेथे राहाणाऱ्या लोकांकडून कळलेली माहिती अशी - श्री. व सौ. सुतार वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांच्या शेजारी राहात. श्री. सुतार आणि वैद्यकीय व्यावसायिक आपले फुरसतीचे क्षण कॅरम खेळण्यात घालवत. श्री. पुजारी आणि श्री. वैद्य (न्यायशास्त्रातील पुस्तकातून डोके वर काढल्यावर) हे दुसरे खेळाडू प्रत्येक शुक्रवारी संध्याकाळी कॅरम खेळण्यास येत. श्री. कोळ्यांना आणि श्री वकिलांनाही कॅरम खेळायला आवडे; परंतु त्यांना कॅरम खेळायला श्री. सुतारांकडे जाणे शक्य नसे. कारण शुक्रवारी संध्याकाळी त्या दोघांच्या बायका महिला मंडळात जात आणि आपल्या नवऱ्यांना घरी राहाण्यास भाग पाडत.

ह्या त्रोटक माहितीशिवाय माझ्या पत्नीला असे कळले की सौ. वकील तसेच तिची जिवलग मैत्रीण सौ. पुजारी या दोघींचे माळ्याच्या बायकोकडे अलीकडेच कडाक्याचे भांडण झाले होते.

ही सारी तुटपुंजी माहिती सुसंगतपणे मांडल्यावर कोणाचा व्यवसाय काय होता हे शोधून काढणे अगदी सोपे होते, हे आमच्या लक्षात आले आणि त्या सहा कुटुंबांची आडनावे व त्यांचे व्यवसाय आमच्या पक्के लक्षात राहिले. तर तुम्ही डोकं चालवा कोणाचा व्यवसाय काय होता ते?

(तार्किक कोडी - डॉ. रमेश काणकोणकर यांच्या पुस्तकातून-साभार)

झटपट रांगोळी

साहित्य : बाजारात मिळणारी रांगोळीची प्लॅस्टिक/कार्डशीटची तयार कात्रणे, टिकल्या, मोती, फेविकॉल

कृती : चित्रात दाखवल्याप्रमाणे आकार कापून घ्यावे. आकाराप्रमाणे बाहेरील बाजूने बारीक टिकल्या चिकटवाव्यात. सोनेरी, पांढरे मोती चिकटवून सजवावे.

टीप : सजावटीसाठी तुम्हाला जे काही वापरायला आवडेल ते वापरू शकता. प्लॅस्टिक कटींगच्या ऐवजी पुठ्ठ्यावर रंगीबेरंगी कागद चिकटवून, आवडते आकार कापून ताटाभोवतीची रांगोळी/दाराबाहेरची रांगोळी असे रांगोळीसाठी वेगवेगळे प्रकार करता येतील.

- अपर्णा म्हात्रे, डोंबिवली

कुठे गर्द झाडीमध्ये गच्च गोठला गारवा। झपाटल्या वाऱ्यासंगे तिथे घुमतो पारवा।।

चित्रपट पाहा : **Toy story** - खेळणी जिवंत झाली तर काय होईल? पाहा या गोष्टीत.

प्रायोजक - कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे

शिवलिंग मोहीम - एक टर्निंग पॉईंट

– उमेश झिरपे

आपल्या आयुष्यात असा एखादा क्षण नक्कीच येतो, ज्याने आपले आयुष्यच बदलून जाते. त्या क्षणाला आपण *टर्निंग पॉईंट* असे म्हणतो.माझ्या गिर्यारोहणाच्या आयुष्यात देखील असाच एक *टर्निंग पॉईंट* आला. त्याने माझी व माझ्या संस्थेची– गिरिप्रेमीची, पुढील वाटचाल अधिक समृध्द बनविली. हा *टर्निंग पॉईंट,* म्हणजे २००७ सालची शिवलिंग शिखर मोहीम.

ते वर्ष गिरिप्रेमी संस्थेचं रौप्यमहोत्सवी वर्ष होतं. या वर्षभरात अनेक उपक्रम राबविले गेले. रौप्यमहोत्सवी वर्षाची सांगता हिमालयातील शिवलिंग शिखर मोहिमेने करण्यात आली. ही मोहीम तेवढी सोपी नव्हती. ही मोहीम करणं हा एक धाडसी पण शास्त्रोक्त पद्धतीवर आधारलेला निर्णय होता; ज्याने गिरिप्रेमीच्या पुढील उत्तुंग यशाची पायाभरणी केली.

खरंतर हे शिखर सर करणं तितकंसं सोपं नव्हतं. याच मोहिमेमुळे गिरिप्रेमीची ख्याती जगभर पसरली. तांत्रिकदृष्ट्या अत्यंत अवघड शिखरांच्या यादीमध्ये शिवलिंगचा समावेश होतो. जवळपास २१,४६७ फूट उंच असणाऱ्या या शिखरावर पोहोचण्यासाठी, एक अवघड टप्पा पार करून जाणं आवश्यक असतं. हा टप्पा म्हणजे ९०^{0} कोनामध्ये उभी असलेली बर्फाची एक भिंत!! जवळपास ३००–३५० फुट उंच असलेली ही भिंत चढून जाणे म्हणजे एक दिव्य पराक्रमच आहे; कारण भिंतीच्या वरच्या भागातून कधीही हिमकडा कोसळण्याची भीती असते. एखादी छोटी चूकदेखील जीवावर बेतू शकते. तर अशा या शिवलिंग शिखरावर जाण्याची तयारी आम्ही सुरू केली.

शिवलिंगवरील याआधीच्या मोहिमा :

गिरिप्रेमीने याआधी १९९४ साली शिवलिंग मोहिमेवर जाण्याचा एक अयशस्वी प्रयत्न केला होता. संस्थेच्या कसलेल्या गिर्यारोहकांनी तेव्हा शिवलिंगची ती ३५० फुटी खडी भिंत चढण्याचा प्रयत्न केला. पण त्यावेळी भिंतीवरील हिमकडा कोसळल्याने प्रसाद ढमाल व सुरेंद्र चव्हाण, हे आमचे गिर्यारोहक जखमी झाले. परिणामी त्यांना मोहीम अर्ध्यावर सोडून यावे लागले. २००७ पर्यंत शिवलिंगवर अनेक मोहिमा झाल्या; पण एकही भारतीय नागरी मोहीम यशस्वी होऊ शकली नाही. गिरिप्रेमीच्या आधी नुकतेच भारतीय सैन्याने व पश्चिम बंगालमधील एका गिर्यारोहकांच्या चमूने प्रयत्न केला होता, पण शिवलिंगवर चढाई करण्यात त्यांनाही यश आले नव्हते.

शिवलिंगची पूर्वतयारी

शिवलिंग मोहिमेचा आधीचा अनुभव आमच्यासाठी मोलाचा होता. 'मंदा', या तेवढ्याच कठीण शिखरावर चढाई करण्याचा प्रयत्न इ. स. १९८९ व १९९१ साली, म्हणजे दोनदा करण्यात आला; पण दोनही वेळेला यश आले नाही. त्याचं दुःख मला सलत होतं. खूप प्रामाणिक प्रयत्न करून देखील यश मिळत नाही, याची खंत होती. आता योग्य नियोजन करून, पूर्वी केलेल्या चुकांचा अभ्यास करून, त्या कशा टाळता येतील त्याबाबत विचार करून मी स्वतः शिवलिंग मोहिमेची तयारी सुरू केली.

या तयारीचा पहिला टप्पा होता संघनिवडीचा. या संघामध्ये एकूण १२ सदस्य निवडले गेले. यामध्ये आठ जण प्रत्यक्ष गिर्यारोहण करणार होते, तर उर्वरित चार जण *सपोर्ट टीममध्ये* होते.

कुठल्याही मोहिमेच्या पूर्वतयारीमध्ये सर्वात महत्त्वाचा भाग असतो, तो आर्थिक पाठबळाचा. या मोहिमेचा

निश्चयाचा महामेरू पार करत जा पुढे। श्यामल अरण्यांना छेदत पार कर डोंगरकडे।।

चित्रपट पाहा : हरिश्चंद्राची फॅक्टरी – दादासाहेब फाळकेंच्या 'राजा हरिश्चंद्र' चित्रपटाची निर्मिती कशी झाली हे सांगणारा.

प्रायोजक - सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे



सर्व खर्च हा जवळपास दहा लाखांच्या घरामध्ये होता. पण पंचवीस वर्षांमध्ये गिरिप्रेमीने जोडलेल्या स्नेहींच्या सहकार्यामुळे ही रक्कम जमविणे फार अवघड गेले नाही. मोहीम यशस्वी करण्यासाठी शारीरिक व मानसिक कणखरतेबरोबरच सुयोग्य तांत्रिक गिर्यारोहण साधनांची आवश्यकता होती. ती साधने आम्ही या निधीतून खरेदी केली. कुठल्याही परिस्थितीत साधनांच्या गुणवत्तेवर तडजोड करावयाची नाही, यावर मी ठाम होतो.

प्रत्यक्ष मोहीम

२००७ सालच्या जून महिन्यामध्ये आम्ही गंगोत्री परिसराकडे रवाना झालो. गंगोत्री मंदिरापासून अठरा किलोमीटरचा ट्रेक करत गेलं की गोमुख लागतं. तिथं गंगा नदीचा प्रत्यक्ष उगम होतो. त्यानंतर आम्ही पुढे दहा किमी चालत जाऊन, हिमगंगा (गंगेची हिमनदी) नदी पार केली. आमची सुरुवात तर अगदी चांगली झाली होती. नियोजनाप्रमाणे आम्ही *बेस कॅम्प, ॲडव्हान्स बेस कॅम्प, कॅम्प १, कॅम्प २,* करत करत *कॅम्प ३* पर्यंत पोहचलो. आता आमचा खरा कस लागणार होता. समोर उभी असलेली ३५० फुटी बर्फाची भिंत आम्हाला सर करायची होती. या संपूर्ण मोहिमेच्या दरम्यान 'अति उंचीवरील स्थानिक भारवाहक' आमच्या मदतीला होतेच. यामध्ये ग्याल्बू व पसांग शेर्पा, राजू साही, चंद्र बहादूर व लक्ष्मण यांचा समावेश होता. यातील लक्ष्मण हा एक कसलेला गिर्यारोहक होता. १९८१ साली जेव्हा उत्तरकाशी येथील प्रसिद्ध नेहरू गिर्यारोहण संस्थेच्या प्रशिक्षक संघाने पहिल्यांदा शिवलिंग शिखर सर केलं. त्या चमूमध्ये लक्ष्मणचा सहभाग होता. अशा या कसलेल्या संघाबरोबर, आम्ही ती खडी भिंत चढण्यास सुरवात केली.

आम्हा हवी मोकळी हवा अन् शुभ्र हिमालय सर्वांचा। नंदनवन हे सौंदर्याचे डाग नसावा रक्ताचा।।

चित्रपट पाहा : नारबाची वाडी – लोभामुळे सर्वनाश ओढवतो हे शिकवणाऱ्या नारबाची गोष्ट.

प्रायोजक - श्री. अजित भिडे (डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. २५३८०४०६), पुणे

गिर्यारोहणामध्ये काटकोनातील भिंत चढण्यासाठी जे *फ्रंट पॉईंट टेक्निक* वापरतात, त्याच्या आधारे आमच्या संघाने भिंत चढण्यास सुरवात केली. यामध्ये गिर्यारोहक आपल्या बुटांच्या पुढील भागाचा *(फ्रंट पॉईंट)* वापर करून *क्रॅम्पॉनच्या* (बुटाला खालून लावलेले खिळे सदृश्य साधन) साहाय्याने चढाई करून बर्फाच्छादित भिंतीवर चढाईचा मार्ग तयार करतात. काही वेळेस अशा भिंतीवर पकड आणखी मजबूत करण्यासाठी त्याच जागेवर पुन्हा एकदा बुटाच्या साहाय्याने आधार घेत चढाई करण्यात येते.. परंतु या भिंतीवरील बर्फ काही ठिकाणी ठिसूळ असल्याने या तंत्राचा वापर करताच त्या जागेवरील बर्फ निघण्यास सुरवात झाली व उन्हाच्या प्रभावामुळे बर्फ काहीसा वितळून पाणी वाहण्यास सुरुवात झाली. त्यामुळे त्या भिंतीवरील जवळपास ५०-५५ फुटांचा चढाईचा मुख्य मार्ग खराब झाला. तीन दिवस प्रयत्न करून देखील आम्हाला भिंत चढता येत नव्हती. या दरम्यान, पुढील नियोजनावरचा ताण वाढला. अशा अवस्थेत जास्त काळ तिथे राहणे कठीण होते. यामुळे शिखर चढाई अंतिम टप्प्यात असताना अक्षरशः शिवलिंगची ही भिंत आडवी आल्याने मोहीमेला पूर्णविराम लागण्याची चिन्हे दिसू लागली. संघामध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली. संघातील कोणाचीही मोहीम सोडून जाण्याची तयारी नव्हती. अशा परिस्थितीत काहीतरी निर्णय घेणे आवश्यक होते.

'एका नवीन तंत्राचा वापर करावा', असं यावेळी माझ्या मनात आलं. *फ्रंट पॉईंट टेक्निकमुळे* जो मार्ग खराब झाला होता. त्या जागेवर *आईस पिटॉन* (खिळे) फिरवून बसविण्याचा प्रयत्न आम्ही केला. त्या खिळ्यांना आट्या असल्याने ते खिळे बर्फात रुतून बसले. त्या खिळ्यांना एक छोटी शिडी बसवून गिर्यारोहकांनी पन्नास फुटी उंचीची भिंत टप्प्याटप्प्याने पार केली व त्यापुढे *फ्रंट पॉईंट टेक्निकचा* वापर करत उर्वरित भिंत सर केली.

उन्हामध्ये बर्फ वितळून कडा कोसळण्याची भीती असल्याने, आम्ही भल्या पहाटे या नवीन तंत्राचा वापर करून हा अवघड टप्पा पार केला. यासाठी आठ जणांच्या संघाला, ४-४ असे विभागले. एका दिवशी एक संघ, असे करत दोन दिवसांत शिवलिंग शिखर सर केले.

इथे एक प्रसंग मला मुद्दाम तुमच्याशी *शेअर* करावासा वाटतो. निलेश आवारे नावाचा एक गिर्यारोहक, भिंत चढत अर्ध्या अंतरापर्यंत केला व अचानक थांबला. दोराच्या साहाय्याने वर जात असताना अचानक त्याच्या अंगातील त्राण गेलं. तो गलितगात्र झाला त्यामुळे तो तिथंच अडकून राहिला. त्यावेळी संघप्रमुख होता अविनाश कांदेकर. ही भिंत पार करून तो वर गेला होता. पुन्हा निलेशच्या मदतीसाठी अविनाश भिंतीवरून खाली आला. निलेशला कॅम्प ३ ला सोडून, अविनाश पुन्हा ती ३५० फुटी भिंत चढला व शिवलिंगच्या माथ्यावर पोहचला. अशा पेचाच्या परिस्थितीत संघ प्रमुख म्हणून निर्णय घेणे खूप अवघड असते. तरी देखील प्रसंगावधान राखत अविनाशनं निलेशला मदत केली. हे खरंच कौतुकास्पद होतं.

या मोहिमेने काय दिले?

गिरिप्रेमीने शिवलिंग शिखरावरील पहिली नागरी मोहीम यशस्वी केली. या यशस्वी मोहिमेने गिरिप्रेमीला जगभर पोहोचविले. या मोहिमेची दखल गिर्यारोहण जगात प्रसिद्ध असणाऱ्या अमेरिकेतील 'अमेरिकन अल्पाईन जर्नलने' घेतली. या मोहिमेनं 'गिरिप्रेमी'ला *टर्निंग पॉईंट* मिळवून दिला. त्याच आत्मविश्वासावर पुढे २०१२ साली गिरिप्रेमीने एव्हरेस्ट शिखर सर केले. त्यानंतर २०१३ ला लोहत्से एव्हरेस्ट (जगातील चौथे सर्वात उंच शिखर), २०१४ साली मकालू (जगातील पाचवे सर्वात उंच शिखर) शिखर सर करून यशाची घोडदौड चालूच ठेवली. हे सर्व शक्य झाले, त्या एका *टर्निंग पॉईंटमुळे.* तो क्षण गिरिप्रेमीने मेहनत करून, यश-अपयशाची कारणमिमांसा करून खेचून आणला.

असेच ध्येयपूर्तीचे क्षण तुम्हाला अनुभवायचे असतील तर कष्ट करा, प्रामाणिक रहा, यश तुमचेच आहे. तुमच्या आयुष्यातील *टर्निंग पॉईंटसाठी* तुम्हाला खूप खूप शुभेच्छा.

※※※

- उमेश झिरपे
१२३२, सक्सेस चेंबर्स,
आपटे रस्ता, पुणे 411004

अनुभव सारे शोषुन घेऊ, धुंदी अनभवू साहसातली। पाय ठेवूनी जमिनीवरती झेपच घेऊ गगनापुढती ।।

चित्रपट पाहा : विहीर - भावाच्या मृत्यूमुळे आयुष्याचा अर्थ शोधू पाहणाऱ्या मुलाची गोष्ट.

प्रायोजक - सौ. रंजना सतीश कुलकर्णी, सातारा

विज्ञान प्रयोग

...तरीही बादलीतले पाणी सांडणार नाही !

रोलर कोस्टरमधून जाताना गाडी उलटी झाली तरी खाली पडत नाही. उपग्रह पृथ्वीभोवती फिरताना पृथ्वीवर पडत नाहीत, उलट ते एकाच कक्षेतून फिरतात! आश्चर्य वाटत असेल ना? एखादी वस्तू वक्रमार्गाने जाताना ज्या बलाने (force) मध्याकडे खेचली जाते त्या बलाला केंद्रगामी बल (centripetal force) म्हणतात. या क्रियेत वस्तूचा वेग (गती आणि दिशा) सतत बदलत असतो. कारण वस्तुची दिशा सतत बदलत असते. जोपर्यंत बाहेरून दुसरे बल कार्य करत नाही तोपर्यंत त्या वस्तूची गती तीच असते. एखाद्या ठिकाणी, वस्तूची दिशा ही त्या ठिकाणच्या केंद्रगामी बलाला लंबरूप (Perpendicular) असते.

वर्तुळासाठी केंद्रगामी बल हे पुढील समीकरणावरून मिळते. $F = ma = mv^2/r$

जेथे F = बल; m = वस्तुचे वस्तुमान; a = केंद्रगामी प्रवेग; v = वस्तुचा वेग; r = वर्तुळाची त्रिज्या

उद्‌देश : केंद्रगामी बलाचे कार्य पाहणे आणि केंद्रगामी बलाच्या समीकरणाद्वारे प्रयोगाच्या परिणामाचा अंदाज करणे.

प्रयोग : पाण्याने भरलेली बादली उभ्या प्रतलात जास्त वेगाने फिरवल्याने त्यातल्या पाण्याचे काय होते व कमी वेगाने फिरवल्यास त्यातल्या पाण्याचे काय होते?

साहित्य : प्लॅस्टीकची छोटी बादली, पाणी, तांब्या, वजनकाटा, मीटरपट्टी (किंवा फूटपट्टी), वही, पेन्सील.

कृती : १. तुमच्या हाताचे खांद्यापासून मुठीपर्यंतचे माप घ्या. ते मीटरमध्ये मोजून वहीत नोंदवा.
२. रिकाम्या बादलीचे वजन करा. ३. पाण्याने अर्धी बादली भरून वजन करा. ४. दोन्ही वजनांची वजाबाकी केल्यास पाण्याचे वस्तुमान मिळेल ते किलोग्रॅममध्ये करून वहीत नोंदवा. ५. बाहेर मोकळ्या जागेत जाऊन हात पूर्ण लांब करून बादली वर्तुळाकार परिघावर उभ्या प्रतलात जोराने फिरवा. ६. बादली फिरवण्याचा वेग हळूहळू कमी करा. काय होते ते पाहा. बादलीतले पाणी केव्हा सांडते?

आणखी काय कराल? १. हाच प्रयोग पाण्याच्या वेगवेगळ्या वस्तुमानांसाठी करा. २.बादली फिरत असताना दुसऱ्या एखाद्या वस्तूने लांबून आघात करून बघा. ३. प्लॅस्टीक आणि हिंडालियमची बादली घेतल्यास काही फरक पडतो का?

निष्कर्ष : बादली फिरताना गुरुत्वीय बल केंद्रगामी बलापेक्षा जास्त झाल्यास पाणी सांडते; पण गुरूत्वीय बल तेवढेच किंवा कमी असेल तर पाणी सांडत नाही.

कारण : फिरणाऱ्या बादलीवर केंद्रगामी बलाबरोबर केंद्रोत्सारी बलसुद्धा (centrifugal force) कार्य करत असते. केंद्रोत्सारी बल हे फिरणाऱ्या बादलीला वर्तुळमध्यापासून दूर नेण्याचा प्रयत्न करते. जडत्वामुळे केंद्रोत्सारी बल निर्माण होते. जडत्व म्हणजे वस्तूची स्थिती न बदलण्याची प्रवृत्ती. न्यूटनच्या गतिविषयक तिसऱ्या नियमानुसार फिरणाऱ्या हातामुळे, बादली व त्यातील पाण्याला केंद्रोत्सारी बल दूर खेचते. जेव्हा पाण्याचे वजन (mg) हे केंद्रोत्सारी बलाएवढे किंवा कमी असेल तर बादली उलटी झाली तरी पाणी सांडत नाही.

समतोल स्थितीत, केंद्रगामी बल = केंद्रोत्सारी बल

$ma = mg = mv^2/r$, यातील g म्हणजे गुरुत्वीय प्रवेग, $g = 9.8\ m/s^2$ याउलट, फिरण्याचा वेग कमी झाला तर पाण्याच्या वजनापेक्षा केंद्रोत्सारी बल कमी होते म्हणून पाणी सांडते.

काय शोधाल? – 'गोफण' फिरवताना केंद्रगामी व केंद्रोत्सारी बलं वापरली जातात का?

***

– **विनोदिनी अळवणी**, ५, मिलन सोसायटी, कोथरूड, पुणे 411038

यत्न तोचि देव आम्हा क्षण आमुचा नसे रिता। ध्यास आता विज्ञानदृष्टी व्हायचे जगी, महासत्ता।।

चित्रपट पाहा : तारें जमीं पर – ८ वर्षांच्या मुलाच्या विचित्र वागण्याचा घेतलेला वेध.

प्रायोजक – डॉ. विनायक देसूरकर, पुणे

हँगआउट

– शिल्पा कुलकर्णी

ही आहे तुमच्यासारख्याच एका मुलाच्या डायरीची पानं... अशाच एका घडलेल्या प्रसंगामुळे तो कसा अस्वस्थ झाला नी स्वत:ची ती अस्वस्थता दूर करणारा तोडगा त्यानं स्वत:च कसा शोधला? त्याच्याच शब्दांत वाचूया...

आज कित्येक दिवसांनी मी माझी लाडकी ‘डायरी’ समोर ओढून लिहायला बसलोय. परीक्षा सुरू होण्याअगोदर १५ मार्चला शेवटचं मी या डायरीत लिहिलं होतं. बरोब्बर सव्वा महिन्यांचा खंड!! (आज मी लिहितोय ते तशाच काहीशा खास कारणानं...)

परीक्षेच्या दरम्यान कित्ती आणि काय-काय विचार मनात येत होते. पण तेव्हा वेळ कुणाला होता डायरीत लिहीत बसायला? मग मी ठरवलं, ‘परीक्षा संपली रे संपली, की रोजच्या रोज दिवसभरात मनात आलेले विचार, अंहं ***'thoughts'*** (असं म्हटलं, की लगेच किती भारी वाटतं नं!) लिहूनच काढायचे.’ पण काय करणार? महिना झाला तरी डायरीची पानं कोरीच! कदाचित मी ‘कोरा’ राहिलो म्हणून पानं कोरी राहिली का?...

परीक्षा असताना सुट्टीबद्दल काय-काय *‘प्लॅन’* मी रंगवायचो. त्यापैकी एक म्हणजे मित्रांसोबत *late-night hangout !* या नुसत्या कल्पनेनंच मी थरारलो होतो. पण प्रत्यक्षात तो थरार मी अनुभवलाच नाही. मग मला ‘मी’ म्हणजे फारच ‘बाळू’ वाटायला लागलो. ‘तस्सं’ म्हणजे *‘दिल से...’* ‘मनातलं...’ मनापासून लिहावं असं काहीच घडलं नाही.

ठरवलं होतं, की सकाळी अगदी उशीरा उठायचं. पण परीक्षा संपल्याच्या दुसऱ्या दिवसापासून जणू मला ‘निद्रानाश’ जडला. मोबाईलचा *alarm* न वाजता पहाटे पाचलाच मला जाग आली. उशीरा उठायचं म्हणून गादीवर तस्सा पाऊणतास लोळत काढला. तोपर्यंत स्वयंपाकघरातून आईचे भांड्यांचे आवाज, चहाचे – कॉफीचे वास, पेपरवाला, दूधवाला यांची ‘बेल,’ त्यानंतर आमची कार पुसणाऱ्या गणेशचा आवाज!

या सगळ्या लोकांना भल्या पहाटे यायची काय गरज असते? गणेशला एवढ्या पहाटे उठून लोकांच्या गाड्या धुवायला कसं जमतं, देव जाणे! छोट्या-छोट्या कारणांनी माझी चिडचिड वाढत होती – या चिमण्या एवढ्या कर्कशपणे का चिवचिवाट करतात? कोकिळेला पहाटेच गायचा ‘मूड’ का येतो वगैरे. नशीब आजूबाजूला कोंबडा नाही; नाहीतर त्याच्याही आवाजाची त्यात भर!! अशा सगळ्या पार्श्वसंगीतात मला झोप लागणं केवळ अशक्य होतं.

उठलोच आहोत तर जरा *TV* पाहू म्हटलं, तर घरच्यांनी वेळा वाटून घेतलेल्या! मला त्यांच्या *टाईम टेबलमध्ये* स्थानच नाही. *'prime time'* मध्ये *रिमोट* त्यांच्या हातात. त्यांच्या दुपारच्या झोपेच्या वेळी काय तो *रिमोट* माझ्या

मळलेल्या वाटांवरती फुले सुगंधी देती सल्ला। तरिही पुढल्या अनाम वाटा हसत साद घालती मजला।।

चित्रपट पाहा : श्वास – आयुष्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहायला शिकवणारा चित्रपट.

प्रायोजक – श्री. निनाद रामचंद्र कात्रे, डोंबिवली

हाती? विचारल्यावर मला म्हणतात, *'happy meal* संकल्पनेसारखे *enjoy* कर *TV* चे दुपारचे *happy hours!'*

अरे! हे म्हणजे, 'जा खुश्शाल गोव्याला मे महिन्यात आणि लूट समुद्राची मज्जा' म्हणण्यासारखं आहे!! *बेडरूमचा TV* युद्धपातळीवर दुरुस्त करून घ्यायलाच हवा, हेही ठरवलं. (तो अजूनही तसाच नादुरुस्त आहे.) दरम्यान नातेवाईकांची लग्न-मुंजीची आमंत्रणं आली. आईच्या हट्टामुळे काही कार्यांना गेलो. तर तिथे 'कित्ती मोठा झालास... केवढासा पाहिला होता तुला,' असल्या छापील वाक्यांनी *बोअर* झालो होतो. आई-बाबांबरोबर बाहेर जाताना फार कसंसंच वाटत होतं...

शेवटी एक दिवस आम्ही मित्रांनी मिळून रात्री दहाच्या सिनेमाचा *प्लॅन* केला. त्यानंतर *hangout!* मग पहाटे पक्याकडे जायचं. त्याच्याकडे झोप काढून एकदम दुपारीच घरी परतायचं. असा भरगच्च कार्यक्रम ठरवला. बाबांनी आई, आजीला समजावल्यावर मला परवानगी मिळाली. आम्हा मित्रांना खूपच उत्सुकता होती. *'शो'* साधारण साडेबाराला संपला. *hangout* म्हणजे नक्की काय करायचं असतं? याबाबत कोणालाच स्पष्टता नसल्यामुळे; 'पुढे काय' हा आमच्यापुढे प्रश्नच होता! हो-नाही करत 'चांदणी चौका' पर्यंत जायचे ठरले. सगळे 'सुसाट' सुटलो. एके ठिकाणी पोलिसानं माझी गाडी अडवली. माझ्याकडे *लर्निंग लायसन्स* मागितलं. *excitement* मध्ये ते मी घरीच विसरलो होतो. शिवाय मी *डबलसीट* घेतलं होतं. शेवटी मी बाबांना फोन लावला. (नशीब मोबाईल मध्ये *बॅलन्स* होता.) बाबा त्या पोलिसाशी बोलले. त्यानंतर पोलिसानं आम्हाला भलं मोठ्ठं *लेक्चर* दिलं. मग मिळालेला ताजा *पॉकेटमनी* दंडाच्या रूपात मी पोलिसाच्या हातावर जड अंत:करणानं ठेवला आणि अखेर आम्ही सुटलो. थोडं पुढे गेल्यावर पक्याची गाडी पंक्चर झाली. गाडी जवळच्या *मॉलमध्ये* लावून आळीपाळीने दोघांना घरी सोडलं आणि मी घरी परतलो. *मूडच* गेला सगळ्यांचा! अशा तऱ्हेने आमच्या *hangout* ची ऐशी की तैशी झाली...

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे पहाटे गणेश आला. किमान २-३ आठवडे तरी कार धुवायला तो येऊ शकणार नव्हता. बाबा त्याच्याशी बोलत होते. खूपच अशक्त दिसत होता तो! बाबांनी देऊ केलेले पैसे गणेशनं घेतले नाहीत. 'कार पुसायला बदली मुलगा बघायला हवा' असं बाबा आईला म्हणत होते.

बाबांना गणेशबद्दल भारी आपुलकी होती. एक दिवस बाबांनी गणेशसाठी आयुर्वेदिक औषध आणलं. ते मला नेऊन द्यायला सांगितलं (मी जरा नाखुशीनेच उठलो). पक्याला बरोबर घेतलं अन् गणेशच्या वाडीत गेलो. कचऱ्याचं साम्राज्य पसरलं होतं तिथं. बुटकी पत्र्याची घरं खेटून-खेटून, दाटीवाटीनं उभी होती. आम्ही गणेशचं घर शोधत गेलो. गणेशला कावीळ झाली होती. डॉक्टर त्याला तपासत होते. वाडीतल्या लोकांना तपासायला डॉक्टर नेहमीच येत असत. मी औषध आणलेलं पाहून खूष झाले ते! मला शाबासकी आणि गणेशला औषधे देऊन ते निघून गेले.

गणेशच्या आईनं लगबगीनं आम्हाला बसायला खुर्ची दिली. आम्ही 'नको' म्हणत असतानाही प्रेमानं तिनं आमच्यासाठी चहा केला. इतका लालभडक चहा खरं म्हणजे माझ्या घशाखाली जात नव्हता; पण गणेशच्या धाकट्या भावानं तोच चहा आनंदानं प्यायला. मला खूपच आश्चर्य वाटलं. गणेशला देखील आम्ही त्याच्या घरी जाण्यामुळे खूप आनंद झालेला होता. त्या एकाच बारक्याशा खोलीत गणेशच्या दोन बहिणी, एक भाऊ आणि आई-बाबा राहत होते. तरी कुणाची काहीच तक्रार नव्हती. माझी *'रूम'* दोन दिवसांसाठी पाहुण्यांबरोबर मला *शेअर* करावी लागली, तरी मी कुरकुरत असे.

हे जग खूप मोठे आणि तरीही खूप छोटे। संगणकाने जवळ आणले दोन ध्रुव, दोन टोके ।।

चित्रपट पाहा : मसाला – शून्यातून व्यवसायनिर्मिती करणाऱ्या तरुण जोडप्याची कथा.

प्रायोजक - डॉ. प्रियदर्शी सावंत, बोरीवली

असे काहीबाही विचार एका पाठोपाठ एक मनात धडकायला लागले आणि तिथे मी अस्वस्थ होऊ लागलो. कधी एकदा माझ्या *'रूम'* मध्ये, माझ्या अगदी 'माझ्या' विश्वात येतोय.. असं मला होऊन गेलं.

गणेशचा धाकटा भाऊ आम्हाला मुख्य रस्त्यापर्यंत सोडायला आला. वाडीत एके ठिकाणी मुलांचा गट जमला होता. काही दादा त्यांचे खेळ घेत होते तर काही कागदी वस्तू (ओरिगामी) बनवायला शिकवत होते. गणेशच्या भावाला त्याबद्दल विचारल्यावर, 'इथे रोजच संध्याकाळी ७.३० ते ९ दादा येऊन आम्हा मुलांना नवनवीन गोष्टी शिकवतात' असं तो म्हणाला. ही एक चांगली गोष्ट सोडली तर जिकडे-तिकडे अस्वच्छता, दारुड्या लोकांची ये-जा, काहींच्या घरी भांडणं असं चित्र वाडीत दिसून आलं. गणेशचं घर मात्र त्याला अपवाद होतं.

घरी आलो, तरी वाडीचं चित्र काही डोळ्यांसमोरून हलत नव्हतं. गणेश माझ्यापेक्षा फक्त दोन वर्षांनी मोठा. दिवसभर लोकांच्या गाड्या धुवून, फावल्या वेळात भावंडांना, वाडीतील मुलांना शिकवून रात्र-महाविद्यालयात तो शिकण्यासाठी जात होता. 'दिवसभर काम करून गणेश स्वत:च्या आणि भावंडांच्या शिक्षणासाठी पैसे मिळवतो,' असं त्याच्या आईनं आम्हाला किती अभिमानानं सांगितलं.

'माझ्या आईला माझ्याबद्दल

पुष्कळ मिळो धन, विद्या, देण्याचेही भान हवे। भोवतीच्या जगाबद्दल तुमच्या मनात प्रेम हवे।।

चित्रपट पाहा : वळू – खेड्यात एका बैलाला पकडायला आलेल्या वनाधिकाऱ्याची कथा.

प्रायोजक - श्री. सौरभ सुधीर दप्तरदार, पुणे

असं अभिमानानं काय बरं सांगता येईल?' *सोचनेवाली बात थी।* या विचारानं माझी उरलीसुरली भूकही नाहीशी झाली. मला काय होतंय तेच कळत नव्हतं; पण काहीतरी सलत होतं! नकळत मी माझी आणि वाडीतल्या मुलांची तुलना करु लागलो... ती रात्र बेचैनीत गेली.

दुसऱ्या दिवशी आईनं जे पानात वाढलं, ते मी निमूटपणे खाल्लं. त्या दिवशी आईलाही आश्चर्यच वाटलं. 'एकाही पदार्थाला नावं न ठेवता जेवलायस आज! अशानं अन्न पचणार नाही हं तुला!!' अशी आईनं माझी चेष्टादेखील केली. तरीही मी गुमसुम राहिलो. आजीनं,

'काही बिनसलंय का? पक्याबरोबर भांडण वगैरे, बाबांकडे काही मागायचंय का?' असं तिच्या पद्धतीनं 'खोदकाम'ही केलं. पण माझं मलाच कळत नव्हतं; त्यामुळे तिला तरी मी काय सांगणार होतो? माझी अस्वस्थता मात्र शिगेला पोहोचली होती.

शेवटी मी, पक्या, मन्या, अम्याला घेतलं आणि वाडीत गेलो. तिथे खेळ घेणाऱ्या दादांना भेटलो. आम्ही चौघांनीही त्यांच्याशी गप्पा मारल्या. तेही वाडीतल्या मुलांबद्दल भरभरून बोलत होते. आम्हाला चौघांनाही त्या दादांबरोबर बोलून बरं वाटलं. मग हळूहळू आमचं संध्याकाळचं *hangout* वाडीत जणू ठरूनच गेलं. आम्ही त्या मुलांमध्ये रमून गेलो. गणेशची भेट होऊ लागली. आई रोज विचारायची, 'कुठं जाताय' आणि 'आलोच तासाभरात,' असं सांगून मी तिथून निसटत असे. माझ्या अशा नियमितपणे गायब होण्यानं आई काळजीत पडलेली मला दिसत होती. पण तिला काही सांगावं असंही काही घडलं नव्हतं.

...एक दिवस अचानक मनात विचार चमकला. बाबांना सांगितलं, 'मी आपली कार रोज धुवत जाईन, त्या बदल्यात तुम्ही गणेशला देता तेवढे पैसे मला द्यायचे.'

बाबा कबूल झाले पण म्हणाले, 'त्या पैशांचं तू करणार आहेस काय?'

'ते मी नंतर सांगेन. *surprise* आहे ते !!' मी म्हणालो.

ही गोष्ट बाबांनी खूप *lightly* घेतली कारण 'आरंभशूर' अशीच घरी माझी ख्याती होती. त्यामुळे आमचं संभाषण तेवढ्यावरच थांबलं. मला मात्र एकदम हलकं-हलकं वाटू लागलं...

मी माझी ख्याती खोटी ठरवत महिनाभर नेमानं कार धुतली. आज महिनाभरानं मला कार धुण्याचे पैसे बाबांकडून मिळाले. गणेशला मिळतात त्याच्यापेक्षा कितीतरी जास्त! पण मिळालेले जास्तीचे पैसे मी बाबांना परत केले.

'मग काय आजचा *hangout* जोरदार दिसतोय...पैसे मिळालेत,' आई मिस्किलपणे म्हणाली.

'अगदी जबदरस्त *प्लॅन* आहे,' मी डोळे मिचकावत म्हणालो. बाबांकडे पाहून म्हणालो, 'आता तुम्हा सगळ्यांना *surprise* द्यायची वेळ आली आहे.'

एकंदरीत गणेश, त्याचं कुटुंब, तिथली मुलं, त्यांना शिकवणारी 'दादा' मंडळी या सर्वांबद्दल माझ्याकडून आपसूकच भरभरून बोललं गेलं. आता प्रश्न होता तो माझ्या मेहनतीच्या कमाईचा! 'ते पैसे तिथल्या मुलांना खेळाचं, ओरिगामीचं सामान आणि पुस्तकं आणायला मी देणार आहे,' असं जाहीर करून टाकलं!!

त्यावर, काहीही न बोलता बाबांनी मारलेली मिठी मला खूप काही सांगून गेली. तर आजीच्या आणि आईच्या डोळ्यांत कौतुक मावत नव्हतं. आमचा *फॅमिली पॅक* माझ्या डोळ्यांसमोर आनंदानं 'वितळत' होता आणि फ्रिजमधून नुकताच टेबलावर काढलेला आईसक्रीमचा *फॅमिली पॅक* उगीच त्यांच्याकडे पाहून हसतानाचा भास मला होत होता...

❊❊❊

– शिल्पा कुलकर्णी
सी-२०४ पाटे संस्कृती,
तुळशीबागवाले कॉलनी,
सहकारनगर क्र. २,
पुणे 411009

आपण सारे जाणुनि घ्यावे, 'यत्न देव' हे ध्येय असावे। 'नव्या युगाची' नवीन किरणे, तेज उजळताहेत।।

चित्रपट पाहा : देऊळ – देवाच्या भक्तीचे बाजारीकरण कसे होते हे सांगणारी गोष्ट.

प्रायोजक - श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे

समस्यांचे वर्गीकरण

– स्मिता निरगुडकर

सोहम *– परीक्षा जवळ आली, की मला जाम भीती वाटते.*

तेजस *– अरे हो ना! परीक्षेत उत्तरं आठवतील का? पेपर वेळेत पूर्ण होईल ना! यांचं सारखं दडपण असतं.*

असे संवाद आपल्याला आपल्या आजूबाजूला सतत ऐकू येत असतात. अशा प्रकारच्या अनेक भीती किंवा अडचणी, समस्या मुलांना जाणवत असतात. लहानाचे मोठे होणे ही गोष्ट तितकीशी सहज, सोपी नसते. आजच्या विज्ञानयुगात तर ही गोष्ट दिवसेंदिवस अधिकच अवघड होताना दिसते आहे. प्रौढांप्रमाणेच वाढीच्या वयातील मुलांनाही अनेक समस्यांना समोरे जावे लागत आहे. त्याचा ताण समाजातही प्रकर्षाने जाणवतो आहे. मुलांना जाणवणाऱ्या काही ढोबळ समस्यांविषयी आपण इथे बोलणार आहोत. ढोबळ असे म्हणण्याचे कारण म्हणजे, 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या उक्तीप्रमाणेच प्रत्येक मुलाच्या सभोवतालचे वातावरण, त्यांना मिळणाऱ्या संधी, त्यांच्याकडून असणाऱ्या अपेक्षा या भिन्न असतात. त्यामुळे प्रत्येक मुलाला जाणवणाऱ्या समस्या ह्या वेगवेगळ्या असू शकतात. या समस्यांचे आपण सर्वसाधारण चार गटात वर्गीकरण करू शकतो.

१. शारीरिक समस्या
२. भावनिक समस्या
३. कौटुंबिक समस्या
४. शैक्षणिक समस्या

शारीरिक समस्या

साधारणपणे बाल्यावस्थेनंतर येणाऱ्या या टप्प्यावर मुला-मुलींना खूप मोठ्या शारीरिक बदलांना सामोरे जावे लागते. या होणाऱ्या बदलांविषयी आधीच्या वाढीच्या टप्प्यावर मानसिक तयारी पुरेशी झालेली नसल्याने मुला-मुलींच्या मनात भीती निर्माण होते. त्याच गोष्टींवर सतत विचार होत रहातो. कोणाशी याबाबत बोलावे असा संभ्रम निर्माण होतो. या काळात शारीरिक विकासाची गती जलद असल्याने शारीरिक थकवा, सुस्ती, उदासीनता या समस्यांना सामोरे जावे लागते. शरीरात होणाऱ्या रासायनिक बदलांचा परिणाम पचनसंस्थेवर होतो. त्यातच खाण्याच्या काही विशिष्ट सवयींमुळे आरोग्याच्या तक्रारी निर्माण होतात. याच वयात आपल्या दिसण्याविषयीदेखील काही प्रश्न मनात निर्माण होत असतात.

भावनिक समस्या

भावनाविष्कार कशा पद्धतीने व्हावा याविषयी पालकांच्या आणि समाजाच्याही काही अपेक्षा, मापदंड असतात. सामाजिक दडपण समजू लागलेले असल्याने तीव्र भावनिक ताण निर्माण होतात. मुलांना मात्र स्वत:च्या भावना अगदी स्वैर, मुक्तपणे व्यक्त करणे आवडत असते. त्यामुळे याविषयीचे काही प्रश्न गंभीरपणे निर्माण होताना दिसतात. चिंता, भीती, आक्रस्ताळेपणा, चिडचिड वाढते. क्वचित अति नम्रतेनेही वागले जाते. मित्रमंडळींचा प्रभाव वाढल्याने असुखद भावना व्यक्त होताना त्यावर नियंत्रण येते. कारण त्यामुळे मित्रांकडून अस्वीकार होण्याची भीती मनात येते. या असुखद भावनांचा निचरा होण्यासाठी मग घरातील भावनाविष्कार हे अधिक आक्रमक होतात. त्यामुळे पालकांची नाराजी ओढवून घेतली जाते. अशा भावनिक नियंत्रणामुळे खिन्नतेचा, त्रस्ततेचा व दबलेल्या मानसिक ताणाचा अनुभव येतो. कधी सगळ्यांचा खूप

मायपित्यांचे ऋण माथ्यावर, गुरुचरणांचे स्मरण निरंतर। भविष्य उज्ज्वल दावित राहिल, वाट क्रमित जावे।।

चित्रपट पाहा : भाग मिल्खा भाग – 'मिल्खा सिंग' या धावपटूच्या आयुष्यावर चित्रित गोष्ट.

प्रायोजक - श्री. निखिल धारवाडकर, बंगळुरू

राग येतो तर कधी खूप प्रेम वाटते.

कौटुंबिक समस्या

या वयात पालकांचे वर्तनासाठीचे मापदंड मुलांना जुने वाटतात. मित्र-मैत्रिणीप्रमाणे वर्तन करण्याची सहज-सुलभ आवड निर्माण होते. पण पालकांकडून ते अमान्य केले जाते. पालकांच्या मुलांकडून असणाऱ्या अपेक्षा, वेळेबाबत घातलेले निर्बंध, इतर मुलांशी होणारी तुलना, फक्त अभ्यास आणि परीक्षा यांना दिले जाणारे अवास्तव महत्त्व, कायम लहान मुलाप्रमाणे मिळणारी वागणूक त्यामुळे काही कौटुंबिक प्रश्न निर्माण होऊ शकतात. पालकांची शिस्त लावण्याची पद्धती अन्याय्य वाटत असते. पुरेशी समज नसल्याने, आपल्यावर अन्याय होतो असे वाटून लहान भावंडांबद्दल तिरस्कार तर मोठ्या भावंडांविषयी प्रतिकारात्मक वृत्ती तयार होते. त्यामुळे भावंडांबरोबर पटवून घेण्याच्या मन:स्थितीत मुले नसतात. 'आपण दुर्लक्षित आहोत का?' असे वाटून असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते. कुटुंबाच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा मुलांमधील समस्या वाढण्यात खूप मोठा वाटा असतो.

शैक्षणिक समस्या

शाळेबाबत एकूणच तक्रारींचा सूर असतो. विशेषत: गृहपाठ हा नेहमीच जास्त आहे असे वाटत असते.सर्व विषयांचा गृहपाठ एकाच दिवशी का? असाही प्रश्न असू शकतो. शाळेतील शिस्तीबाबत इतर शाळांची तुलना आपल्या शाळेशी केली जाते. 'इतर शाळांच्या तुलनेत आपल्याच शाळेत खूप बंधने आहेत,' याविषयी तक्रारी असतात. अभ्यास म्हणजे एक कटकट, वैताग अशी भावना असते. परीक्षेची भीती, दडपण अभ्यास करूनही वेळेवर नीट आठवेल का नाही अशी चिंता वाटणे, अपयशाची भीती इ. समस्या असू शकतात. शिक्षक व एकूणच शाळेतील सर्व घडामोडी याबाबत सर्वच मुलांच्या मनात समस्या, अडचणी असतात.

या सर्व समस्यांचा विचार केला तर असे लक्षात येईल, की प्रत्येक क्षेत्रात व प्रत्येक टप्प्यावर काही ना काही प्रश्न हे असतातच. जीवन म्हटले, की समस्या या येणारच; जगात असा कोणीही नाही की त्याला समस्या नाहीत. सर्व क्षेत्रातील येणारी आव्हाने स्वीकारून ती यशस्वीपणे पेलण्याची कला शिकणे आवश्यक आहे. काहीजण समस्या आहे हेच नाकारतात, तर काहीजण समस्या दिसली की बिचकतात व त्या पासून दूर जाण्याचा प्रयत्न करतात. आणि काहीजण त्या समस्येतून बाहेरच पडू शकत नाहीत. त्यांचे छोटे प्रश्नही मग खूप मोठे होतात. समस्येतून स्वत:ला दूर करणे म्हणजेच 'समस्या परिहार.' हे एक कौशल्य आहे. त्यामुळे हे कौशल्य आपल्याला शिकायलाच हवे. तरच आपण सुखी आयुष्य जगू शकू .

आपली समस्या समजून घेणे ही समस्या परिहारातील पहिली पायरी आहे. यासाठी समस्या जाणवणाऱ्या घटनेकडे, प्रसंगाकडे त्रयस्थपणे, कोणतेही पूर्वग्रह न ठेवता पाहणे, सारासार विचार करणे गरजेचे आहे व ते जमवले पाहिजे. त्या समस्येचे व घटनेचे, प्रसंगाचे विश्लेषण करता यायला हवे. यासाठी पुस्तकांची, त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांची, पालकांची, शिक्षकांची मदत घेणे, त्यांच्याशी चर्चा करणे योग्य ठरेल.

निवडलेल्या मार्गाने समस्या सुटली नाही किंवा त्यात काही अनपेक्षित अडचणी आल्या तर कोणाची मदत घ्यायची, याचाही काही विचार मनाशी करून ठेवायला हवा.

तर महत्त्वाचे असे की समस्या ह्या येणारच. त्यांना घाबरून, बिचकून राहिले तर आपली प्रगती कशी होणार? समस्या उभी राहिली, की ती सोडवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. जुन्या समस्या पटपट सोडवून नवीन येणाऱ्या समस्यांना तोंड देणे हे कौशल्य आपल्याला शिकायलाच हवे.

❊❊❊

- स्मिता निरगुडकर
प्रज्ञा मानस संशोधिका, ज्ञान प्रबोधिनी,
५१४ सदाशिव पेठ, पुणे ३०

पान क्र. १६ वरील तार्किक कोड्याचं उत्तर -
श्री. सुतार माळी आहेत. श्री. कोळी वैद्य आहेत.
श्री. माळी कोळी आहेत. श्री. वैद्य वकील आहेत.
श्री. वकील पुजारी आहेत आणि श्री. पुजारी सुतार आहेत.

फुलास नसते जात कधीही गंधाला नसते वसती। तुम्ही आम्ही आनंदलेकरे, माय एक हो या जगती।।

चित्रपट पाहा : शाळा - कुमारवयीन भावविश्व उलगडणारी कथा.

प्रायोजक - श्री. अजित कानिटकर, पुणे

अनुभवसंपन्न आणि अर्थपूर्ण सुट्टीसाठी... व्यक्तिकार्ये – भाग २ (५ वी ते ८ वीच्या मुला–मुलींसाठी)

मित्रांनो, ही सुट्टी अधिक अनुभवसंपन्न व अर्थपूर्ण करण्यासाठी सुट्टीत तुम्ही एकूण २० कामे पूर्ण करायची आहेत. मागील अंकात (सौर चैत्र/एप्रिल २०१५) त्यापैकी दहा कामे दिली होती. त्यातील काही कामे तुम्ही आत्तापर्यंत पूर्ण केलीही असतील. काम पूर्ण झाले, की वहीत दिनांक घालून त्यापुढे ते नोंदवून ठेवा. काम करताना आलेली मजा, झालेली फजिती, मिळालेला नवीन अनुभव इ. गोष्टीही थोडक्यात लिहा. शक्य झाल्यास आपल्या आई–बाबांची त्यापुढे स्वाक्षरी घ्या. आता पुढील १० कामे या अंकात देत आहोत. ती पूर्ण करा आणि घरच्यांच्या शाबासकीबरोबर छात्र प्रबोधनतर्फे बक्षीसही मिळवा.

व्यक्तिकार्ये – १. जवळच्या भाजीच्या दुकानात जाऊन दहा पालेभाज्यांची माहिती करून घ्या व कोणतीही एक पालेभाजी आणून त्याची भाजी तयार करा. (निवडण्यापासून शिजवण्यापर्यंत सर्व कृती तुम्हीच करायची आहे.) **२.** बँकेत स्वत:च्या किंवा आई–बाबांच्या खात्यात काही रक्कम जमा करा व काही रक्कम काढून आणा. **३.** तुमच्या घरात कचऱ्यात टाकून दिल्या जाणाऱ्या ५० वस्तूंची यादी करा. त्यांचे ५–७ गटात वर्गीकरण करा आणि त्यातल्या एका वस्तूचा कशा रितीने पुन्हा वापर करता येईल याबद्दल दहा कल्पना लिहा. **४.** स्वत:चा एक ड्रेस धुवून त्याला इस्त्री करा. **५.** घरी आलेले वीज बिल दरपत्रकाप्रमाणे तपासून, ते भरून या. तसेच घरातील विजेवर चालणाऱ्या यंत्रांची एक यादी करा. प्रत्येक यंत्र एका तासाला किती वीज वापरते याची माहिती मिळवा. एका दिवसात विविध यंत्रे (दिवे, पंखे, फ्रीज) किती तास चालू होती याच्या नोंदी ठेवून एकूण किती युनीट वीज वापरली गेली ते काढा. तुमच्या वीज मीटरच्या रिडींगशी ते तपासून पाहा. **६.** घरात असलेल्या पुस्तकांची (पाठ्यपुस्तके व अभ्यासाव्यतिरिक्तची पुस्तके) यादी तयार करा व त्यातल्या एखाद्यातरी जुन्या पुस्तकाची बांधणी करा. **७.** छात्र प्रबोधनच्या कोणत्याही एका अंकातील कवितेला चाल लावून ती कविता पाठ करा व घरातल्यांसमोर सादर करा. **८.** घरातील मोठ्या चादरी, पडदे धुवा आणि वाळत टाका. **९.** घरातील आजी/आजोबा किंवा वृद्ध व्यक्तीचे चरित्र लिहा. (वहीची ८–१० पाने) **१०.** कुल्फी/आइस्क्रीम स्वत: घरी बनवा व भावंडांबरोबर खा.

मलपृष्ठाच्या आतील पानावरील सापशिडीचे उत्तर –

२. जीवनसत्व 'ई' ४.दाणे ड्रायफ्रूट नाही. (इंग्रजीमध्ये Ground nut म्हणतात तरी ते nut नाही.) ६. खजूर 'एकदल' आहे. (ते 'पाम' जातीतलं आहे.) ७. वडाला खूप पारंब्या असतात, त्या जमिनीत जातात, त्यातूनही नवीन झाड फुटते. ९. तुळशीच्या पानात 'उडाऊ तेल' असते, ते वायुरूपात आजूबाजूला पसरते त्यामुळे जीवाणूंची वाढ होत नाही आणि हवा निकोप राहते. १०. 'रॅफलेशिया' – (सर्वात मोठे फूल) (या फुलाला खूप घाण वास येतो. रंग–लाल, झाड परोपजीवी आहे) १२. 'व्हिक्टोरिया ॲमेझॉनिका' (ह्या कमळाचे पान मोठे असते आणि ह्या पानावर ६–७ वर्षाचा मुलगा बसू शकतो) १५. साखरभातात 'लवंग' टाकतात १६. महाराष्ट्रातले जंगल प्रकार – पानगळीचे जंगल, निम्नहरित जंगल १७. पानगळीचे महिने – जानेवारी, फेब्रुवारी (पौष, माघ), ऋतु – हेमंत, शिशिर १८. निवडुंगाची पानं 'काट्याच्या' स्वरूपात असतात. २०. वर्षाऋतूचे मराठी माहिने – आषाढ, श्रावण, भाद्रपद २२. घायपात 'एकदल' २४. गोरखचिंच (वृक्षाचा बुंधा बुधल्यासारखा असतो) २५. मुखशुद्धीसाठीच्या बिया–भोपळा २९. मोहाची फुलं मातकट तपकिरी रंगाची असतात (फांद्यांच्या टोकाला झुबक्यानी उन्हाळ्यात येतात) ३१. 'क' जीवनसत्वे असलेली फळं – आवळा, लिंबू, मोसंब, करवंद, डाळिंब ३४. हळद ४२. सतार ४४. दोडक्याची फुलं एकलिंगी ४५. दालचिनी (मसाल्याचा पदार्थ); अर्जुनसादडा (अर्जुनासव, अर्जुनारिष्ट ही औषधं बनवतात) ४६. अळूचे खोड जमिनीत असते (भूमिगत खोड – त्याला अळकुड म्हणतात) ४७. उकड्या तांदूळ ४८. झाडाची प्राथमिक वाढ (उंची वाढायची थांबली) थांबली की साल तयार होते.

पुसून टाकू निवडुंगाच्या नक्षीची पाटी। नव्या पहाटे फुलासारखे उमलू देठोदेठी।।

चित्रपट पाहा : भूतनाथ – एका मुलाच्या आणि चक्क एका भुताच्या मैत्रीची कहाणी.

प्रायोजक – सौ. गीतांजली हेमंत जोशी, वाशी, नवी मुंबई

कृतिकौशल्य

टाकाऊतून टिकाऊ
सीडीच्या तुकड्यांनी सुशोभन केलेली फुलदाणी

साहित्य – खराब सीडी, फेविकॉल, प्लॅस्टीक बाटली, काळ्या रंगाचा थ्रीडी आऊटलायनर, लेस, वहीचा पुठ्ठा इ.
कृती – कटर अथवा कात्रीने (मोठ्या) सीडी कापून भरपूर तुकडे करून घ्या. त्यानंतर बाटलीवर फेव्हीकॉल लावून चकाकणारी बाजू वर येईल अशा रितीने सीडीचे तुकडे चिकटवून घ्या. पूर्ण वाळल्यानंतर थ्रीडी आऊटलायनरने प्रत्येक तुकड्याच्या कडेने बाह्यरेखा (आउटलाइन) काढून घ्या. बाटलीच्या पृष्ठभागापेक्षा एक इंच मोठा गोल कापून

बाटली त्यावर ठेवून चिकटवा. बाटलीच्या कडेने जी जागा राहील त्यावर टिकल्या, मणी लावून सुशोभन करा. तयार झालेल्या फुलदाणीत थोडी वाळू टाकून घ्या व वेगवेगळी कृत्रिम/नैसर्गिक फुले घेऊन फुलदाणीत ठेवा. छान फुलदाणी तयार होईल. खराब झालेल्या सीडीपासून छान वस्तू तयार होईल. सीडीच्या तुकड्यांऐवजी तुम्ही रंगीत बांगड्यांचे तुकडे, रंगीत रांगोळी, अथवा रंगीत पेपरचे तुकडे चिकटवूनही ही फुलदाणी बनवू शकता.

बांगड्यांचा पेनस्टँड



साहित्य : वेगवेगळ्या आकाराच्या, वेगवेगळ्या रंगांच्या प्लॅस्टीक अथवा काचेच्या बांगड्या, रंगीत कागद, कार्डशीटचा गोल, टिकल्या किंवा मणी, फेविकॉल.
कृती : एकाच आकाराच्या बांगड्या एकमेकांवर फेविकॉल लावून चिकटवून घ्या किंवा मोठी बांगडी घेऊन त्यावर त्याहून छोट्या आकाराची बांगडी चिकटवा. पुन्हा त्यावर पहिल्या बांगडीपेक्षा (आपल्याला हव्या तितक्या) छोट्या बांगड्या चिकटवत जा. असे दोन तयार झालेले भाग घ्या. सगळ्यात वरच्या छोट्या बांगडीवर दुसऱ्या भागाचा छोटी बांगडी चिकटवलेला भाग ठेऊन चिकटवून घ्या म्हणजे डमरूसारखा आकार तयार होईल. तुमचा वेगळ्या आकाराचा पेनस्टँड तयार होईल. एकाच आकाराच्या बांगड्याही एकमेकावर ठेवून फेविकॉलने चिकटविल्यासही आकर्षक पेनस्टँड तयार होईल. पेनस्टँडला खालील बाजूस कार्डशीटचा गोल रंगीत कागद चिकटवा. सर्वात वरील बांगडीवर छोट्या आकाराच्या टिकल्या किंवा मणी चिकटवा.

❋❋❋

– **शोभना साठे**, ११४३, 'दीपक', शुक्रवार पेठ, पुणे 411002

धर्मग्रंथ का कधी सांगतो मारा, ठोका, जुलूम करा। आम्ही कोंडिला पानांमधुनी माणुसकीचा खोल झरा।।

चित्रपट पाहा : देख इंडियन सर्कस – सर्कशीतील आयुष्याची नाट्यमयता दाखवणारा चित्रपट.

प्रायोजक – श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे

छंदातून कलानंदाकडे...

• तुमच्या छंदाची सुरुवात कशी झाली?

माझे पणजोबा एखाद्या आर्किटेक्टच्या तोडीस तोड असे किल्ले, ऐतिहासिक वास्तू यांची मॉडेल्स बनवायचे. निवृत्तीनंतर पूर्णवेळ ते विविध कलात्मक वस्तू बनवण्यात रमायचे. तेव्हापासून म्हणजेच अगदी शालेय वयापासून भेटकार्डे, निमंत्रणपत्रिका, विविध प्रकारचे कागद, आकर्षक चित्रे संग्रही ठेवण्याचा छंद मला लागला आणि निरीक्षणातून छंदासाठीच्या विचारप्रक्रियेस सुरुवात झाली. त्यातूनच छंदाचे कलेत रूपांतर झाले.

मला कोणतीच वस्तू टाकून द्यायला आवडत नाही. प्रत्येकाने आपापल्या परीने त्याचा पुनर्वापर केला पाहिजे. जुनी भेटकार्डे, निमंत्रणपत्रिका, दिनदर्शिका, रिकाम्या कॅप्सुल्स्, थर्माकोलचे तुकडे, स्पंज, मणी, गोफांचे तुकडे, वाळलेली पाने, लाकडाचा भुसा इ. अनेक गोष्टींचा वापर करून मी आकर्षक कलाकृती तयार करतो. टाकाऊ वस्तू त्यातही मुख्यत्वे कागदाचा वापर करून नवनिर्मिती करणे हेच माझे विश्व. 'टाकाऊतून टिकाऊ' कलात्मक वस्तू बनवणे हा माझा छंद आहे. गंमत म्हणून सांगतो, एक-दीड किलोची रद्दी मला ३-४ महिने पुरते.

• तुमच्या या कलेतून तुम्ही अनेक विषय हाताळले आहेत, त्याबद्दल काय सांगाल?

मुळात कला ही सर्जनशील असल्याने विविध विषय हाताळण्याचा मी प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रातील किल्ले, भारतीय सण आणि त्यातून प्रकट होणारी संस्कृती, लग्न - मुंजीत रूखवतात व बारशात ठेवण्यासाठी विविध कलात्मक वस्तू, बारा राशी, योगासने, यांचा वापर करून तयार केलेली तोरणे असे अनेक विषय हाताळले आहेत. एका घडीतील त्रिमितीतील प्राणी आणि त्यांचा वापर करून शुभेच्छापत्रे तयार केली. ५६ वर्षापर्यंत बँकेमध्ये मॅनेजर म्हणून काम केल्यामुळे बँकेसंदर्भात *पेन्शनर्सचे* प्रश्न, निवृत्तीनंतर काय? *पेन्शन - नो टेन्शन, व्हि. आर. एस.* जोडपे असे विषय व्यंगचित्राच्या कोलाजद्वारा साकार केले आहेत.

पणजोबांच्या प्रभावामुळे लहानपणापासून कागदाच्या नवनवीन आकर्षक कला-कौशल्याच्या वस्तू बनवण्याचा छंद पालकर सरांना जडला. बँकेची नोकरी सांभाळत त्यांनी 'टाकाऊतून टिकाऊ' वस्तू बनवण्याची आपली कला जोपासली. आपल्या कलेचं भांडार सरांनी मुलांसाठी खुलं केलं. गतिमंद मुलांच्या विकासासाठी त्यांनी आपल्या कलेचा उपयोग केला. सातत्याने गेली वीस वर्षे सरांच्या अनोख्या कलाकृती 'छात्र प्रबोधन' मासिकातून कुमारांसाठी प्रसिद्ध होत आहेत. आज वयाच्या ब्याऐंशीव्या वर्षीही अखंडपणे कलासाधनेत रममाण असलेल्या, 'कला हेच आपले अध्यात्म' मानणाऱ्या श्री. मधुकर पालकर सरांचा कलेविषयीचा दृष्टिकोन सोबतच्या मुलाखतीतून जाणून घेऊया.

• आपल्या कलेचा उपयोग आपण समाजासाठी करता त्याविषयी...

कला ही स्वत:कडे ठेवण्याची वस्तू नसून इतरांना दिल्याने ती अधिक वाढते. 'गतिमंद मुलांसाठी या माध्यमाचा वापर केला तर त्या मुलांना आकलनासाठी उपयोग होईल का?' असा विचार मनात आला. 'विद्याज्योती' या गतिमंद मुलांच्या शाळेत जाऊन मी मुख्याध्यापकांना भेटलो. आणि गतिमंद मुलांना शिकवायला मी त्या शाळेत जाऊ लागलो. या मुलांना प्रसंगाचे सहजतेने वर्णन करता येत नाही. पण त्या प्रसंगाच्या आधारे तयार केलेल्या कोलाजवरून खूप छान पद्धतीनं मुलं त्या प्रसंगाचे वर्णन करतात. चित्राद्वारे ते वर्णन मुलांच्या मनात खोलवर ठसते. त्यामुळे त्या मुलांना लक्षात ठेवण्यास मदत होते. शाळेतील मुलांसाठी

हातात हात घालुनी सदा जपू बंधुत्व ते। एका सुरात नित्य गाऊ देशभक्तीची गीते।।

चित्रपट पाहा : स्टॅनले का डिब्बा - शाळेत डबा न आणण्यामागची स्टॅनलेची गोष्ट.

प्रायोजक - श्री. सुरेंद्र कापसे, प्रिस्टन, अमेरिका

योगासनांचे तक्ते, भूगोलाचे तक्ते, अभ्यासातील विविध संदर्भांचे कोलाज मी जाणीवपूर्वक तयार करू लागलो. या व्यतिरिक्त 'छात्र प्रबोधन', 'किशोर', 'माझी मैत्रीण' अशा विविध मासिकांसाठी तसेच सकाळ, पुढारी, लोकसत्ता इ. वृत्तपत्रांसाठी मुखपृष्ठे केली. कौशल्यपूर्ण वस्तू बनवण्याच्या कृती लिहून पाठवल्या.

बँकेतील नोकरी असल्यामुळे एकूण १६ ठिकाणी माझी बदली झाली. नोकरीच्या प्रत्येक गावी मुलांसाठी कृतिकौशल्याच्या कार्यशाळा विनामूल्य घेतल्या आहेत. महाराष्ट्राबाहेर आंध्रप्रदेश, अरुणाचल प्रदेश इ. ठिकाणी मुलांसाठी छंदवर्ग घेतले आहेत. बालकल्याण केंद्रात १५० शिक्षकांसाठीही कार्यशाळा घेतली होती. हैद्राबाद येथे राजघराण्यातील एका शाही लग्नसमारंभात जेवणाच्या पंगतीत पानाभोवती वेगवेगळ्या प्रकारच्या रांगोळ्या काढण्याचे काम हौशीनं केलं.

• तुमची कला तुम्ही प्रदर्शनात मांडली आहे का?

लता मंगेशकर यांना ६० वर्षे पूर्ण झाली त्या निमित्ताने पुण्याच्या बालगंधर्व-कला दालनात 'वाद्यांचे कोलाज' या विषयावर मी प्रदर्शन भरवले होते. कर्नाटक हायस्कूलमध्ये भरलेल्या चित्रांच्या प्रदर्शनात ४० चित्रे (कोलाज) मांडली होती. तिथे चित्रांना मागणी आल्यामुळे बरीचशी चित्रे चांगल्या किंमतीत विकली गेली होती. ठाणे येथील बेडेकर हायस्कूलमध्ये पूर्वीपासून आत्तापर्यंत खेळल्या जाणाऱ्या प्रचलित खेळांच्या कोलाजचे प्रदर्शन भरवले.

मात्र रुखवतासाठी बनवलेल्या वस्तू करतानाचे कष्ट लक्षात न घेता समारंभाअखेरीस अक्षरश: त्या वस्तू कशाही ठेवल्या जातात; या गोष्टीचा मला खूप राग येतो.

• या कलेने तुम्हाला काय दिले?

कात्री, कागद, गम अशा वस्तूंसोबत थोडीशी कल्पनाशक्ती, चिकाटी दाखवून वेळेचा कल्पनात्मक वापर मी करतो. अशाप्रकारे माझा कलेचा रियाझ सुरू असतो. स्वत:च्या हाताने केलेली वस्तू दिल्यावर समोरच्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरील आनंद आणि गतिमंद मुलांना शिकवून मिळणारे समाधान अतुलनीय आहे.

• काय शिकायचे राहून गेले असे तुम्हाला वाटते?

शिकण्याला वयाचे बंधन नसावे असे मला वाटते. त्यामुळे वयाच्या ब्याऐंशीव्या वर्षीदेखील जे-जे मनाला भावेल, शिकावेसे वाटेल ते-ते, लहान-थोर सर्वांकडून शिकण्याचा माझा प्रयत्न असतो. परवाच्या वृत्तपत्रात 'कॅलिग्राफी' शिकण्याविषयी निवेदन आले होते. यंदा 'कॅलिग्राफी' करायला मी शिकणार आहे. कारण अक्षर सुंदर असणं हे खूप महत्त्वाचं व उपयोगाचं असतं. चित्र मला एवढे चांगले काढता येत नाही, याची खंत वाटते. काही ठरावीक प्रकारच्या कोलाजसाठी चित्रकारांकडून माणसांचे चेहरे मला काढून घ्यावे लागतात. त्यामुळे काही प्रमाणात चित्रकलाही मला शिकायची इच्छा आहे.

• या तुमच्या प्रवासात घरच्यांचा पाठिंबा कसा होता?

सुरुवातीला या छंदापोटी घरातील सर्वजण मी 'कचरा' गोळा करतो म्हणून ओरडायचे. पण ओरडण्यापेक्षा तयार केलेल्या कलाकृतीचे कौतुक अधिक करायचे. मित्रमंडळीही आपुलकीने मला 'उपयुक्त' 'टाकाऊ वस्तू' आणून देतात. पत्नीचा व एकंदरीत सर्व घरच्या मंडळींचा खूप पाठिंबा व सहकार्य आहे. माझ्या कला प्रांतातील मित्रमंडळींकडून कौतुकामुळे मला खूप ऊर्जा मिळते. त्यामुळेच कल्पकतेने मी नवनिर्मिती करू शकतो.

• कुमारांसाठी आपण काय सांगाल?

आजचे जग हे टीव्ही, संगणक, मोबाईल अशा अनेक प्रलोभनांचे आहे. या गोष्टींमध्ये वाहवत न जाता वेळेचा योग्य उपयोग करा. वाढदिवसाला किंवा सण समारंभाला स्वत: बनवलेल्या वस्तू भेट द्या. निरीक्षण आणि कृतितील सातत्याद्वारे तुम्हाला सुचण्यास खूप मदत होते. कमीत कमी *रेडिमेड* वस्तूंचा वापर करून जास्तीत जास्त कल्पक नवनिर्मितीतून मिळालेला आनंद काय असतो, त्याचा अनुभव प्रत्येक मुलानं एकदातरी घ्यावा. कुणी सांगावं? भविष्यकाळात अशा छंदांद्वारे एखाद्या व्यवसायाचं बीज तुमच्या मनात कळत-नकळत रुजेल आणि तुमच्या भविष्याला आकार देईल.

❊❊❊

मुलाखत : शिल्पा कुलकर्णी

शब्दांकन : केवल मुळे, mulekeval@gmail.com

(पालकर सरांच्या कलाकृती मलपृष्ठावर पाहा.)

जातीधर्मा पलीकडे मनी वसे बंधूता। आण आम्हा मातीची या नांदवू जगी शांतता।।

चित्रपट पाहा : हवा हवाई – स्केटिंगचे स्वप्न पूर्ण वेळ पाहणाऱ्या मुलाची व शिक्षकाची कथा.

प्रायोजक - श्री. अतुल कुलकर्णी, पुणे

बशीचे मनोगत



किती दिवस झाले या 'शो'च्या कपाटात पडून राहिलेय मी... बाहेर काढा रे मला, आमची जन्मजन्मांतरीची साथ सुटली, कप बाहेर पडला; पण मी मात्र मागे पडले खितपत!

खरं सांगू, कपानं स्वत:ला *ग्लोबलायझेशनच्या* जमान्यात सामावून घेतलं. माणसं कशी आधुनिक होताना आपलं रुपडं बदलतात. कपानंदेखील आपला आकार बदलला. आणि तो 'मग' झाला. *ग्लोबल* होणारी माणसं दिवाणखान्यात, सभेत, प्रसारमाध्यमात चर्चा करताना मगानं चहा, कॉफी प्यायला लागली. *'कॉफी विथ करन'* यासारखे कार्यक्रम माझ्या जिवावरच उठले. चहाच्या टपऱ्या तर प्लास्टिकचे कप आणि काचेचे ग्लास यांनीच सजल्या आहेत.

माझं अस्तित्व आता राहिलं आहे कुठं? मला वाटतं माझा वापर फक्त आता उडुपिंच्या हॉटेलात काही प्रमाणात होतो. चहा देताना माझा वापर करतात. पण काही वेळा चहा इतका थंड असतो, की माझा उपयोग गिऱ्हाईक करतच नाही. चंगळवादाच्या या जमान्यात रोज नाविन्याची हौस असणाऱ्यांनी मला इतिहासजमा करण्याचा चंग बांधला आहे की काय, अशी भीती सतत वाटते.

आठवतंय, पूर्वी पाहुणा आला, की घरोघरी चहा देताना मी आपली कपाबरोबर असायचे. लहान मुलांचे चहासाठी हट्ट धरणे मला आवडायचे. मग माझ्यात चहा ओतून, तो फुंकून त्यांना दिला जायचा. तो कोवळा स्पर्श हवाहवासा वाटायचा. पण एखादं द्वाड मूल कधी कधी माझा खेळ खलासही करायचा!

विज्ञानाच्या अभ्यासक्रमातही जुन्या काळी माझ्यावर प्रश्न विचारले जायचे. 'कपापेक्षा बशीत चहा लवकर का थंड होतो?- कारणे द्या.' पण आता सगळीकडे इतके गरमागरम विषय अन् चर्चा असतात, की माझ्या थंडपणाचा सगळ्यांना कंटाळा येतो. मी बऱ्याच वेळा चिनीमातीपासून बनवलेली असल्यामुळे उष्णतेची दुर्वाहक आहे. माझ्यात 'थंड'पणा त्यामुळेच येतो.

माझ्यावर आचार्य अत्र्यांनी केलेला एक विनोद मला आठवतो. *ते एकदा बसमधून प्रवास करत होते. शेजारी एक खेडूत बसला होता. रस्त्याच्या दुर्दशेमुळे अत्रे शेजारच्या खेडुताच्या अंगावर सारखे पडत होते. वैतागून तो खेडूत म्हणाला, ''सायेब 'बशी'त कसं कपावानी बसावं.''*

माझं कार्य कपाचा समतोल साधणं हेच आहे. कपाच्या उष्णतेमुळे टेबल, लादी, एखादा कपडा खराब होऊ नये, याचीही मी खबरदारी घेते. कपातील चहा थंड होऊ नये, म्हणून कपावर कधीकधी मला ठेवले जाते.

आज मात्र मी नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. माझं अस्तित्व एखाद्या ग्रामीण भागातल्या कळकट्ट उपाहारगृहात तसंच झोपडीपुरतं मर्यादित राहिलं आहे. एकच आशेचा किरण दिसतो आहे; तो म्हणजे अजूनही वृद्ध माणसं माझा वापर करतात.

कपाच्या सोबतीने त्याचा तोल सावरत फुटेपर्यंत आयुष्य काढायचं ठरवलं होतं. पण आजच्या आधुनिक जीवनशैलीमुळे खाण्यापिण्याच्या पद्धतीत प्रचंड बदल होऊन माझ्या रूपात आकारात, रंगात बदल झाला आहे. कपाला सोडून विविध कारणांसाठी माझा वापर केला जात आहे. पण मला मात्र त्या अजरामर 'कपबशी' या जोडीतच धन्यता वाटते. एखाद्या स्टँडवर पडून आजही मी या आशेवर जगत आहे, की माणसं आज पुन्हा 'जुनं ते सोनं' मानू लागली तर?

❋❋❋

– कु. आरती कुदळे (इ. ९वी)
के. रा. कोतकर विद्यालय, डोंबिवली

तिरंग्याचे पाईक आम्ही धाव आमुची पुढेपुढे। कर्तृत्वाची झेप घ्याया गगन वाटे तोकडे।।

चित्रपट पाहा : The Harry Potter Films हॉगवर्टस् या जादुई शाळेत जाणाऱ्या हॅरी व मित्रांच्या चमत्कारिक गोष्टी.

प्रायोजक - श्री. विद्याधर जोगळेकर, पुणे

जगात हास्य नसते तर...

'आनंदाचा वेध अपुली
साथसंगत सोडत नाही।
गालावरती फुलले हसू
डोळा आसू राहत नाही'।।

हास्य! इवलासा शब्द! अहो, निसर्गातसुद्धा विविध प्रकारचे हास्य दडले आहे.प्रभातसमयी क्षितिजावरचं रम्य गुलाबी हास्य, उसळत्या सागराचं धीरगंभीर हास्य, पर्जन्याबरोबर झिम्मा खेळणाऱ्या बिजलीचे हास्य. श्रावणसरींबरोबर फुलणारं प्राजक्ताचं हास्य, अवखळ निर्झराचं कर्णमधुर हास्य, त्या ओल्या वसुंधरेचं हरित, तृप्त हास्य. निसर्गातील हास्याची दुनिया पाहिली की ब्रह्मानंदी टाळी लागते. पॅरिसच्या म्युझियममध्ये लिओनार्डो-द-व्हिन्सीच्या 'मोनालिसा' च्या चेहऱ्यावरचे गूढ, रम्य हास्य पाहण्यासाठी लोक दूरदुरून येतात. गांधीजींच्या केवळ हास्यातच समाजाला आकर्षित करण्याची शक्ती होती.

हास्य ही क्षणात दुसऱ्याला मोहवून टाकणारी जादूच आहे. पण हे हास्यच जगात नसते तर? आपल्या जीवनाला आल्हाददायक बनविणारी ही गोष्टच नसती, तर काय झाले असते? आपले जीवनच नीरस, कंटाळवाणे झाले असते. आपण आपल्या जीवनातील सुख गमावले असते. जीवनातील दुःख, ताणतणाव नाहीसे झालेच नसते.

साहित्यातील एक महत्त्वाचा भाग हास्याने व्यापला आहे. परंतु हास्यच नसते, तर साहित्यात त्याची उणीव जरूर भासली असती. चिं. वि. जोशी, प्र.के. अत्रे, पु. ल. देशपांडे, रमेश मंत्री यांसारखे विनोदी लेखकच लाभले नसते. लहानपणापासून बोक्या सातबंडे, चिंटू यांसारख्या विनोदी पुस्तकांमुळे आपल्याला वाचनाची गोडी लागते; पण ही पुस्तकेच नसती तर, वाचनही रटाळच वाटले असते. प्र. के. अत्रे, चार्ली चॅपलिन यांसारखे हास्यसम्राट तर सोडाच पण हास्यसम्राट, विनोदवीर या पदव्याही राहिल्याच नसत्या. बघावे तिकडे आपले चौकोनी चेहेरे! विनोदामुळे मनावरील भार हलका होऊन प्रसन्न व आनंदी वाटू लागते. जीवनात

'सुख पाहता जवापाडे।
दुःख पर्वताएवढे।।' असते.

हास्याच्या या महान देणगीमुळे माणसाला जगणे सुसह्य होते.

खरे तर, माणसाला भाषा येण्याच्या अगोदर हसता येत होते. म्हणूनच सुप्रसिद्ध अमेरिकन उद्योजक जोएल गुडमन यांनी म्हटले आहे की, ''हास्य हे दोन व्यक्तींमधील सर्वांत कमी अंतर होय.'' पण हास्य नसते तर समाजात नेहमीच भांडणे, युद्धे होत राहिली असती. हास्य हे मानवी जीवनासाठी व मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. अगदी सोप्या भाषेत सांगायचे झालेच तर, जसे रोजच्या कंटाळवाण्या जेवणातून काहीतरी वेगळं म्हणून आपण कधीतरी पाणीपुरी, पिझ्झा, बर्गरचीही चव चाखतो. तसेच, हास्य आपल्याला मानसिक व बौद्धिक ताणतणावातून विश्रांती देते. पण हास्यच नसते तर हा थकवाही दूर झालाच नसता. त्यामुळे आपली सारी कामे खोळंबली असती. हास्य हे लहानग्यांच्या निरागसतेचे प्रतीकच आहे जणू! वेगवेगळे ताणतणाव अनुभवल्यानंतर एकाएकी झालेल्या सुखाच्या जाणिवेमुळे निर्मळ, निरागस हसू उत्पन्न होते. परंतु हास्य नसते, तर ही निरागसता निराशेत परिवर्तित होऊन एखाद्याने आत्महत्या, दहशतवाद अशी अविचारी कृत्ये केली असती.

दे मला सामर्थ्य देवा, या धरेच्या मृत्तिकेचे। राहुनी पायी जगाच्या विश्व पोटी पोसण्याचे।।

चित्रपट पाहा : The Incredibles - सुपरहिरोजच्या कुटुंबावर आपल्या शक्ती दडवून जगण्याची वेळ येते तेव्हा काय होतं?

श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे, सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला (सायंकाळी), पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४४५१३१९

मुलांचे पान

हास्य आणि आरोग्य यांचा फार जवळचा संबंध आहे. हसणे हा व्यायाम आहे. हास्य आणि दीर्घायुष्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू जणू! काही शास्त्रज्ञांच्या मते, मनमोकळे हास्य ही दु:खापासून मनाला दूर नेणारी एक मानसिक प्रक्रिया आहे. इतर संशोधनांवरून असे दिसते, की हास्यामुळे मेंदूला *कॅटेकोलॅमाइन हार्मोन्स* सोडण्याची सूचना मिळते आणि त्यातून *एंडॉर्फिन्स* किंवा शरीरातील नैसर्गिक दु:खनिवारक द्रव्ये तयार होतात. यातून हास्य व दु:ख यातील व्यस्त परिणाम लक्षात येतो. जर हास्य नसतेच तर आपण निरोगी जीवनही जगू शकलो नसतो. खरं तर, जीवन जगण्याला काही अर्थच उरला नसता. कारण, ‘ज्याच्या जीवनात हास्य नाही, तो निराशेत जगतो. जो निराशेत जगतो, तो जीवन जगत नाही आणि जो जीवन जगत नाही तो मनुष्यच नाही.’ त्यामुळे हास्य आणि मनुष्य एकमेकांपासून वेगळे होऊच शकत नाहीत.

हास्य ही मानवासाठी दैवी देणगीच आहे. हास्य माणसाचे दोष दाखविते. तसेच दोषांसकट माणसाचा चांगुलपणाही मान्य करते. ते दैनंदिन जीवनातील ताणतणाव कमी करावे असे सांगते. ‘हसा आणि निरोगी बना’ असा संदेश देते. मात्र, यासाठी जगात हास्य असायलाच हवे. नाहीतर मानवी जीवन अगदी खडतर होऊन जाईल.

‘हसूया, खेळूया, विनोद जाणूया।
स्नेहभाव जपूनी, यश मिळवूया।।’

✲✲✲

– चि. पियूष बोरसे (इ. ८ वी)
रचना विद्यालय, नाशिक

करून तर पाहा

चिन्हं अनेक, सूर्य एक

साहित्य : १२ × १२ सेमीचा कार्डशीट पेपर, धारदार कटर/सुरी, एक पेन्सिल/बॉलपेन

कृती : कार्डशीट पेपरवर पेन/पेन्सिलने थोडे अंतर राखून छोटे छोटे आकार काढा. (नमुन्यासाठी आकृतीत काही आकार काढून दाखवले आहेत.) नंतर धारदार सुरी/कटरने त्या आकारांच्या आतून कापून घ्या. थोडक्यात आकारांची stencils तयार करा. (कार्डशीट मात्र अखंड राहायला हवा.) आता बाहेर उन्हात जा व कार्डशीट पेपर सूर्यप्रकाशात (जमिनीच्या जवळ) धरा. मग त्या पेपरवरच्या आकारांच्या जमिनीवर पडलेल्या सावल्यांचे निरीक्षण करा. तुम्हाला वेगवेगळ्या आकारांच्या सावल्या याआधी दिसतील. आता हळूहळू तो पेपर जमिनीपासून सूर्यप्रकाशाच्या दिशेने वर न्या. काय दिसते? वेगवेगळ्या आकारांच्या दिसणाऱ्या सावल्या आता वर्तुळाकार दिसू लागतील. जर कागद आणखी वर धरलात तर ती सर्व वर्तुळे एकमेकांत मिसळतील (merging).



असं का होतं? हा चमत्कार नक्कीच नाही. ही गोष्ट optics वर आधारित आहे. प्रकाशाचे जे वर्तुळाकार कवडसे आपल्याला दिसतात ती सर्व सूर्याची प्रतिरूपे (Images) आहेत. ती गोल का आहेत? तर सूर्यच गोल आहे म्हणून. अजून काय काय करता येईल?

१. सूर्याऐवजी प्रकाशाचा स्रोत बदलून पाहा. उदा. बल्ब/ट्यूबलाईट

२. आकारांची संख्या वाढवून पाहा. ३. प्रकाशाची तीव्रता बदलून पाहा.

(AHA! ACTIVITIES या अरविंद गुप्ता यांच्या पुस्तकातून संपादित)

युद्ध नको, विध्वंस नको, शांतिचा संदेश हवा। राम नको अन् रहिम नको, मानवतेचा देश हवा।।

चित्रपट पाहा : The Blue Umbrella - 'Blue Umbrella' या रस्किन बाँडच्या कादंबरीवर आधारित.

प्रायोजक - श्रीमती उमा परांजपे, पुणे

प्रतिसादी वाचकवीर व्हा... (वर्ष १५.८)

हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

दर महिन्याचा 'छात्र प्रबोधन'चा अंक तुम्ही आवडीने वाचत असालच. छात्र प्रबोधनच्या मागील वर्षीच्या वासंतिक अंकापासून (चैत्र/एप्रिल) त्या-त्या अंकावर आधारित काही प्रश्न दर महिन्याच्या छात्र प्रबोधनच्या अंकात देत आलो आहोत. या अंकातील (वर्ष १५ अंक ८) प्रश्नांची **उत्तरे दि. १५ जून २०१५** पर्यंत 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. '१५.८' असा उल्लेख उत्तरपत्रिकेवर करा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी. या निमित्ताने तुम्ही प्रत्येक अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे. (इथून पुढे 'प्रतिसादी वाचकवीर व्हा' या स्पर्धेच्या प्रश्नावलीला छात्र प्रबोधनचे वर्ष व अंकाचा संदर्भ देत आहोत.)

प्रश्नांची उत्तरे लिहा

१) 'धडपड्या धोंड्या' या कथेत धोंड्याची कोणती स्वभाववैशिष्ट्ये तुम्हाला भावली? का?

२) 'शिवलिंग मोहीम ठरली टर्निंग पॉईंट' असे उमेश झिरपे यांनी का म्हटले आहे?

३) चित्रकलेत चित्राचे कोणकोणते प्रकार पडतात? (चित्र समजून घेताना...)

४) 'हँगआउट' या लेखात डायरी लिहिणारा मुलगा वाडीत पहिल्यांदा जाऊन आल्यानंतर अस्वस्थ का झाला असेल, असे तुम्हाला वाटते?

५) 'पाणी-मनात...आत' या कवितेतली आई तिच्या मुलाला कोणता संदेश देत?

६) 'तुम्ही केलेल्या एका वैशिष्ट्यपूर्ण कलाकृतीचा फोटो आणि त्याची कृती लिहून छात्र प्रबोधनकडे पाठवा.

'प्रतिसादी वाचकवीर व्हा...' या प्रश्नावलीची उत्तरे पाठवलेल्या खालील सभासदांचे

*** मन:पूर्वक अभिनंदन !!! ***

कु. नम्रता खानापुरे, कु. शितल गोंधळी, (इ. ८ वी), ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

Judgement

चला पत्ते खेळूया

(१) प्रत्येक डावात पत्ते वाटायच्या आधीच सगळ्यांनी मिळून हुकुम ठरवायचा. म्हणजे खेळ सुरू करायच्या आधीच पहिल्या डावात इस्पिक. दुसऱ्या डावात बदाम, असे हुकुम ठरवून घ्यायचे.

(२) सर्व पत्ते वाटून झाल्यावर प्रत्येकाने आपले किती हात होतील याचा अंदाज सांगायचा.

(३) खेळून झाल्यावर प्रत्येकाने आपले किती हात झाले ते सांगायचं. ते जर सांगितलेल्या अंदाजाइतकेच असतील तर जितके हात असतील, तितके गुण त्या व्यक्तीला मिळतील. जर तेवढे हात झाले नाहीत तर जेवढा अंदाज सांगितला तेवढे उणे गुण त्याच्या खात्यात मांडायचे. उदा. आपण जर ७ हात होतील असा अंदाज सांगिता असेल आणि तेवढे हात झाले तर आपल्या खात्यात ७ गुण मांडायचे. जर ७ पेक्षा कमी किंवा जास्त हात झाले तर आपल्या खात्यात उणे ७ गुण मांडायचे.

(४) खेळ थांबवताना प्रत्येकाच्या गुणांची बेरीज करायची. ज्याचे सर्वांत जास्त गुण असतील तो जिंकला.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ वैशाख, शके १९३७, १ मे २०१५ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे -२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

चला खेळूया सापशिडी

प्रश्नाचे उत्तर बरोबर दिले तर एक डाव जादा खेळायला मिळेल. उत्तर चुकले वा आले नाही तर त्याच घरात राहणे तसंच 'रिकामे' घरात दान पडल्यास एक डाव त्याच घरात राहणे. बाकी नियम सापशिडीप्रमाणे.

६४	६३ मोहाची फुले खाल्ली	६२ भाजलेली जखम बरी झाली	६१ छोटी उशी तयार केली	६० जीवनसत्त्व बी$_3$ मिळाले	५९ एकाच ठिकाणी निलगिरीची झाडे लावली	५८ चवदार बिर्याणी तयार झाली	५७ रिकामे
४९ कोणत्या तांदळाच्या इडल्या चांगल्या होतात	५० झाडाची साल केव्हा तयार होते?	५१ झाडाची साल ओरबाडून काढली	५२ चिंचेत कोणतं ॲसिड असतं?	५३ अळूची भाजी चिंच न घालता खाल्ली	५४ हिरव्या पालेभाज्या खाल्ल्या	५५ रिकामे	५६ अन्नाचे पचन होण्यास मदत झाली
४८ अळूचे खोड कुठे असते?	४७ रिकामे	४६ शाल्मलीच्या म्हाताऱ्या (कापूस) गोळा केल्या	४५ साल उपयुक्त असलेल्या २ वृक्षांची नावे	४४ दोडक्याची फुलं एकलिंगी की द्विलिंगी?	४३ रिकामे	४२ तांबड्या भोपळ्यापासून कोणते वाद्य तयार करतात.	४१ मसाल्याचे पदार्थ भातात टाकले
३३ कोरफड लावली	३४ खरचटल्यावर कोणत्या वनस्पतीची पावडर लावावी?	३५ रिकामे	३६ झाड मरून पडले	३७ भूगर्भातील पाण्याची पातळी खाली गेली	३८ रिकामे	३९ घसा खवखवला	४० रिकामे
३२ रिकामे	३१ 'क' जीवनसत्त्व असणाऱ्या फळांची नावे सांगा	३० लोह शोषून घेण्याची रक्ताची क्षमता वाढली	२९ मोहाची फुले कोणत्या रंगाची असतात	२८ झिंग आली	२७ शेवग्याची झाडे रस्त्याच्या दुतर्फा लावली.	२६ जेवणानंतर भाजलेली बडीशेप खाल्ली	२५ मुखशुद्धी म्हणून वापरल्या जाणाऱ्या किमान २ बिया
१७ पानगळीचे महिने, ऋतू कोणते?	१८ निवडुंगाला पाने असतात का?	१९ रिकामे	२० वर्षाऋतूचे मराठी महिने कोणते?	२१ रिकामे	२२ घायपात एकदल की द्विदल?	२३ रिकामे	२४ भारतातील मोठा घेर असलेला वृक्ष कोणता?
१६ महाराष्ट्रातल्या २ जंगल प्रकारांची नावे सांगा	१५ साखरभातात मसाल्याचा कोणता पदार्थ टाकतात?	१४ मसाल्याच्या तीन पदार्थांची नावे सांगा	१३ रिकामे	१२ कोणत्या कमळाचे पान मोठे असते?	११ रिकामे	१० सर्वात मोठ्या फुलाचे नाव काय?	९ तुळस घराशेजारी का लावावी?
१ चला खेळूया...	२ बदामामध्ये कोणते जीवनसत्त्व असते?	३ रिकामे	४ दाणे 'ड्रायफ्रूट' आहे का?	५ काजू-बदाम संत्र्याच्या रसाबरोबर खाल्ले	६ खजूर एकदल की द्विदल?	७ वड सहसा का मरत नाही?	८ वाऱ्याच्या झोताने कोलमडून पडली

– डॉ. कांचनगंगा गंधे

(उत्तरे अन्यत्र)

सौर वैशाख, शके १९३७/मे २०१५ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर ११ वैशाख, शके १९३७ /१ मे २०१५
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050 /2015 - 2017,
Posted at S.P. Post Office, Pune - 30, on 1st of Every Month

सौर दिनदर्शिका
शके १९३७

	मे २०१५	वैशाख ज्येष्ठ
शु.	1	११
श.	2	१२
र.	3	१३
सो.	4	१४
मं.	5	१५
बु.	6	१६
गु.	7	१७
शु.	8	१८
श.	9	१९
र.	10	२०
सो.	11	२१
मं.	12	२२
बु.	13	२३
गु.	14	२४
शु.	15	२५
श.	16	२६
र.	17	२७
सो.	18	२८
मं.	19	२९
बु.	20	३०
गु.	21	३१
शु.	22	ज्ये.१
श.	23	२
र.	24	३
सो.	25	४
मं.	26	५
बु.	27	६
गु.	28	७
शु.	29	८
श.	30	९
र.	31	१०

संदर्भ : अंकातील पान क्र. २९ पाहा. 'छंदातून कलानंदाकडे...'

पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिन कोड क्रमांक नसल्यास कळवा.

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

या अंकाची किंमत : ₹ २०/-
वार्षिक वर्गणी : ₹ २००/-

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -